
म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. ८५५



# विरलेलें स्वप्न



REFBK-0005237



सं. नं. ८५५
स्थळ प्रत

लेखिका

विभावरी शिरूरकर, बी.ए.

ग्रं. नं. ८४५५

स्थळ प्रत

११०१८

दा. क्र.
५२३८

# विरलेलें स्वप्न

विभावरी शिरूरकर, बी. ए.

प्रकाशक :

हरि विष्णु मोटे, प्रतिभा कचेरी, मुंबई २.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रं. क्र. ५२३८

REFBK-0005237

किंमत दीड रुपया

किंमत एक रुपया

प्रथमावृत्ति, १५ जून १९३५

या पुस्तकासंबंधीं सर्व प्रकारचे हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

मुद्रक :
मं. ना. कुळकर्णी, कर्नाटक प्रेस, कर्नाटक
हाऊस, चिराबाजार, मुंबई नं. २.

# 'विरलेलें स्वप्न'

श्रीयुत ह. वि. मोटे यांस,

स. न. वि. वि.

तुमचं पत्र पोंहोंचलं. मीं पत्र वाचलं नि विषाद वाटला मला. वैशाखचीं स्वप्नं विरलीं. त्याचीं स्वप्नं जशींच्या तशीं नजरेस आणणें अशक्य झाल्यानें **माझींहि स्वप्नं विरलीं.**

खरंच या सर्वांचं कारण कळलं, पटलं तरी वाईट वाटल्यावांचून राहात नाहीं. मनुष्याच्या अंतःकरणांत सात्त्विक उर्मींनाहि मोकळेपणानें उचंबळतां येऊं नये यासारखी दुसरी विषाद वाटण्याजोगी गोष्ट तरी कोणती ? अंतःकरणांत काय खुपतं आहे, जीवनाचा मार्ग आक्रमित असतां कुठं नि कसले कांटे टोंचत आहेत हें कळलं तरी बोलायचं नाहीं ! आणि बोलायचं झालं तरी भलत्याच मिषानं. हृदयांतील जखमांमुळं डोळ्यांतून अश्रू झिरपत असतां त्या हृदयांतील जखमा डोळ्यांत केर गेला या मिषानें कित्येकदां लपवाव्या लागतात तसलाच नाहीं का हा अनुभव ?

वैशाखचीं स्वप्नं विरलीं. कसलीं होतीं तीं स्वप्नं ? तीं स्वप्नं कांहीं प्रेमांत न्हात बसण्याचीं नव्हतीं ना ?

## ‘ विरलेलें स्वप्न ’

तरुणीचं प्रेम हेंच जीवनसर्वस्व मानणारा तर वैशाख नव्हता ना ? मुळींच नव्हता. मानवी जीवनाचं अफाट स्वरूप त्याच्या नजरेला येऊन संकुचित कल्पनांचीं त्याचीं स्वप्नं विरत चाललेलीं होतीं. वैशाखनें मनापुढं उभारलेलीं स्वप्नं किती भव्य असलीं तरी तीं तशीं दाखविल्याचं माझं स्वप्न प्रकाशकाच्या कात्रीनं भंग पावलंच ? वैशाखचीं थरारून टाकणारीं रोमांचकारी स्वप्नं – त्यांची पुसट ओळख तरी ठेवली आहे का नाहीं छाटाछाटीनें ?

छापखान्याच्या खिळ्यांना प्रेम अगर असलेच निरुपद्रवी विषय कागदांवर कोरायला सोपं जातं, वाचणाराला, टीका करणारालाहि तें वाचणं, त्यावर टीका करणं सोपं जातं, पण वैशाखला पडलेलीं स्वप्नं, त्याचीं विरलेलीं स्वप्नं मात्र छापखान्याच्या खिळ्यांपासून टीकाकारांपर्यंत साऱ्यांना भुतासारखीं भेडसावतात. वैशाखच्या दैनंदिनीचा किती तरी भाग तुमच्या कात्रीला बळी पडला ! मग कशीं त्याचीं स्वप्नं कळायचीं ? आणि वैशाखचं खरं स्वरूप तरी कसं दिसायचं ? शीर कापलेल्या धडावरून माणूस ओळखण्याचेच ते प्रयास नाहींत का ?

पण हें लिहीत असतांना माझं मलाच हंसूं येतं आहे. तुम्हांला कशाला दोष द्यायचा ? सगळ्यांचं नाहीं–तरी बहुतेकांचं हें असंच आहे. साहित्यसभेच्या अध्यक्षा-पासून बहुतेक साऱ्यांचं ! साहित्यांतून अश्लीलतेची घाण नाहींशी करण्यासाठीं जिवाचं रान करणाराचे आवाज खऱ्याखुऱ्या जिवंत वाङ्मयाच्या कुचंबणुकीसंबंधीच्या वाङ्मयाच्या ठरावावर बोलतांना मंद झाले. जो तो आव-रून–सांवरून शब्दांची घासाघीस करून—स्वतांचा हात कुठंहि न गवसेल अशा रीतीनें बोलूं लागला असं साहित्य-सभेच्या वेळचं वर्णन मी कुठंसं वाचलं. निरनिराळ्या वीरश्रींची संपादणी करणारे त्याच व्यक्तींचे निरनिराळे मुखवटे डोळ्यांपुढें येऊन मला चमत्कारिक वाटलं खरं. निर्वीर भूमीतलावर रखवाली करणारांचा रणावेश हतबुद्ध करणारा वाटला खरा.

तुम्हांला ज्या तऱ्हेची वाङ्मयनिर्मिति हवी असेल तशी करायला तुम्हीं स्वतः हातांत कुदळी घेऊन स्वतःच्या जखमांची कदर न धरतां हे जागोजागचे बांध पाडा; ते बांध पाडण्यांत भित्रेपणा किंवा पेन्शनर दीर्घसूत्रीपणा कां दाखवावा ?

‘ विरलेलें स्वप्न ’

---

पण हें तरी कशाला लिहितें आहे मी ? साऱ्यांचेच हातपाय जिथं जखडले आहेत तिथं एकमेकांना निवळ वैतागून बोलण्यापलीकडे काय व्हावयाचं आहे ? अशा जखडलेल्या अवस्थेंतहि तरुणतरुणींच्या प्रेमाहून निराळ्या स्वप्नांत – रोमांचकारी स्वप्नांत – रंगलेले तरुण कांहीं थोडे नाहींत. पण त्यांची धडपड कोण पाहणार ? त्यांची दैनंदिनी दृष्टीआडच जळून जायची.

**विभावरी शिरूरकर**

# विरलेलें स्वप्न

सं. सं. ८५
स्थळ

## वैशाख—

### (१)

शक्य नाहीं झोंप येणं. रात्रीचे दोन वाजले आहेत. पण या अंधारांत माझं दबलेलं अंतःकरण अधिकच गुदमरून जाऊं पाहत आहे. मनुष्याच्या गुणांवर व प्रयत्नवादावर त्याच्या आयुष्याचं सुवर्णमंदिर उभं राह्यचं असतं असं कानीं-कपाळीं लहानपणापासून जें-तें ओरडत आलं आहे. माझा विश्वास नाहीं त्यावर. अत्यंत श्रद्धाळूपणानें असल्या बोलण्यावर विश्वास ठेवून मी वाट चालत आलों.

जोंपर्यंत हीं युनिव्हर्सिटीचीं चक्रें निव्वळ पक्षपाताची धार लावून फिरत आहेत तोंपर्यंत नुसत्या प्रयत्नवादाचे पोवाडे गाण्यांत कांहीं अर्थ नाहीं. एकजात सगळ्या प्रोफेसरांनीं माझ्या बुद्धीचं आणि प्रयत्नांचं अभिनंदन केलेलं मला आठवतं आहे. पण वशिल्यावर परीक्षकांचें आसन पटकावणारे व जातिभेदाचे रंगी-बेरंगी चष्मे घातलेले लायक-नालायक लोक जोंपर्यंत आमचीं नशिबं मुठींत धरून बसले आहेत तोंपर्यंत आमच्या प्रयत्नवादाची फसगत अशीच व्हायची. कोणत्या

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. 9236

# विरलेलें स्वप्न

घोड्याला रेस जिंकायला लावायचं हें जॉकीनं ठरवायचं आहे तोंपर्यंत घोड्याची तडफ, हुशारी आणि चापल्य कांहीं उपयोगीं पडणार नाहीं.

शेवटची परीक्षा ही आयुष्यांतील संक्रमणाची अवस्था. ह्यावेळीं कुठला तरी एकादा मठ्ठ पोरगा येतो आणि केवळ जातीच्या नाहींतर वशिल्याच्या जोरावर पुढें घुसून दुसऱ्याच्या नशिबाचें मातेरें करून जातो ! मला या सगळ्याचा अर्थच कळत नाहीं.

माझ्या अल्पबुद्धीनें आई-वडलांच्या सांवलींत मीं उभीं केलेलीं मनोराज्यं खलास झालीं ! श्रीमंताचा मुलगा म्हणून कितीहि गोष्टी मीं केल्या तरी माझ्या कर्तबगारीनें कांहीं प्राप्त केल्याचं समाधान मला मिळणार नाहीं.

## ( २ )

जीव उबून जाण्याइतका कंटाळा आला आहे मला. काय हें सभोंवतालचं वातावरण ! तेंच–तेंच–तेंच जीवन. कुणाला डोळे उघडून बघावंसं वाटत नाहीं. दररोज सकाळीं उठून जीविताचा गाडा पुढें ढकलायचा ! आणि शीणभाग नाहींसा होण्यासाठीं करमणूक कोणती ? तर असेच चार गप्पीदास जमा करायचे; त्यांत सगळ्या ओळखी-अनोळखीच्या लोकांना भरडून काढायचें; त्यांचे वाभाडे काढायचे; शेवटीं कोणातरी पोरी–बाळींचा विषय काढून जिभेला स्वैर नाचूं द्यायचें. दिवसचे दिवस महिनेच्या महिने जातात याच कामांत. पण कुणा एकालाहि आपल्या हृदयांत चाललेलं स्पंदन ऐकण्याची वा ऐकविण्याची इच्छा नाहीं.

मला कित्येकदां कळत नाहींसं होतं कीं या उकिरड्यांत आम्ही कां लोळतों आहों ? सगळ्या गोष्टींबद्दल असमाधान ! मग ? यांतून मार्ग काय ? कीं अशाच एकेका दिवसाच्या फुलबाज्या उडवून आयुष्य संपवायचं ?

कित्येकदां या असल्या जीवनाचा कमालीचा तिटकारा येऊन अत्यंत निराशेच्या त्वेषानेंच मी या उकिरड्यांत

लोळायला लागतों. दुसऱ्या क्षणीं असं वाटतं, कीं हें मनाचें असमाधान अशा लाचारपणानें, उदासीनपणानें वा शैथिल्यानें गाडून टाकणाऱ्या या सगळ्या लोकांच्या व स्वतःच्याहि चिता पेटवाव्या जिवंत ! म्हणजे लांबच्या लांब आयुष्य कंठित बसण्याचा ताण तरी नको मनाला !

( ३ )

असल्या खुळचट गोष्टींचा वर्तमानपत्रांतून ओरडा! काय तर म्हणे सभागृहामध्यें स्त्रिया उभ्या राहिल्या तरी त्यांच्याकडे कोणीं लक्ष्य दिलें नाहीं, त्यांना उभं राहून व्याख्यान ऐकावं लागलं, आणि कॉलेजचे मुलगे बायकांच्या अंगाला अंग घासून जात होते! तिथें गर्दी कोण!.... चें व्याख्यान. सगळ्यांचीं अंतःकरणें ... नीं वेधून घेतलेलीं. अशा वेळीं शेजारीं कोण आहे इकडे सुद्धां आमचं लक्ष्य नव्हतं. कुणीकडून तरी व्याख्यात्यांना पाहण्याची आणि त्यांचे शब्द ऐकण्याची उत्सुकता! पण एकंदरींत मी पाहतों, या बायकांची स्त्रीत्वाची जाणीव क्षणभरसुद्धां जाऊं शकत नाहीं! आणि आम्ही त्यांच्या जाणीवेला भरच देतों. तुम्हांला सगळं पाहिजे. पुरुषांशीं सगळ्या बाबतींत समानतेचा झगडा करायला हवा, मग त्यांच्याइतकं सोसायचीहि तयारी हवी मनाची. स्त्रीदाक्षिण्याची भलत्या गोष्टींत अपेक्षा करणंसुद्धां वेडगळपणाचं आहे. मला पुष्कळ वेळां वाटतं कीं या स्त्रीदाक्षिण्याच्या नांवाखालीं चाललेला ढोंगीपणा या बायकांना कळत तरी नसावा किंवा त्यानेंच त्यांची तृप्ति होत असावी.

# विरलेलें स्वप्न

" स्त्रिया पूज्य आहेत " असं म्हणून एकांनीं त्यांना कायमच्या घरांत डांबून अप्रत्यक्ष सुलतानशाही गाजवावी आणि दुसऱ्यांनीं वरवर स्त्रीदाक्षिण्य दाखवून अंतरंगांत मात्र स्त्रीजातीबद्दल हीनपणाची भावना दडवून ठेवावी. कोणताहि स्त्रीदाक्षिण्याचा प्रकार घ्या, त्यांत स्त्रीबद्दल कमीपणाच मनांत दडलेला असतो.

हें लादलेलं आणि कुजलेलं स्त्रीदाक्षिण्य! यानेंच जर आमचा स्त्रीसमाज खूष राहणार असेल तर खऱ्या व्यक्तित्वाची किंमत ओळखून त्यांचा विकास व्हायला किती वर्षें लागणार आहेत कोण जाणे!

## ( ४ )

माझ्या या स्पष्ट नकारानें अण्णांना किती वाईट वाटलं असेल याची मला कल्पना आहे. पण खरोखर मला हा विलायतचा किनारा कां गांठायचा हेंच कळत नाहीं. कुणाच्या निढळाच्या घामावर मीं हा हव्यास धरायचा हें जेव्हां मला स्पष्ट दिसतं, तेव्हां मला असा परदेशीं जाण्याचा अधिकार आहे का याबद्दल संशय उत्पन्न होतो.

अण्णा म्हणतात त्याप्रमाणें मी उद्यां एखादी पदवी घेऊन आलों, – काय होणार आहे माझ्यांत फरक ? बॅरि-स्टर व्हायचं, नाहीं तर पीएच्. डी. होऊन यायचं ! काय करीन मी इथें येऊन ? आणि कशानें माझें समाधान होईल ? प्रवासाचा म्हणून मी जो अनुभव गोळा करीन तो हिंदुस्थानांतील विचित्र परिस्थितींत कधीं तरी तावून-सुलाखून पाहतां येणं शक्य आहे का ? कितीतरी पर-देशची पंढरी करून आलेले लोक मी पाहतों. मनुष्य वातावरणांत फारफार उंच गेला कीं एक वेळ अशी येते कीं त्या वातावरणाचा दाब न राहून मनुष्य फाटतो. मला पुष्कळ वेळां वाटतं, परदेशच्या कल्पनांना आणि

वातावरणला न सरावलेले आमचे लोक तेथें जातात आणि त्यांचीं अंतःकरणं आणि मनं फाटतात ! हिंदुस्थानांतला दरिद्रीपणा विसरून इंद्रनगरींत प्रवेश झाल्याचा आभास घेऊन बसणारे हे विद्यार्थी सोम, अप्सरा आणि कितीक गोष्टींनीं लाचार होतात. आपल्या हिंदुस्थानचा मृत्युलोक ते विसरतात; आणि जेव्हां त्या नंदनवनांतून मर्त्य म्हणून ते स्वस्थानीं परत येतात तेव्हां केल्या-उपभोगल्याची मनावरची धुंदी जात नाहीं. हिंदुस्थान तर नंदनवन होऊं शकत नाहीं. मग तशाच धुंदींत, तशाच स्थितींत फाटलेल्या मनानें ते समाजांत वावरत असतात. दुसरे कितीतरी लोक तिकडून जाऊन मनावर व अंतःकरणावर कोणतेच संस्कार उमटवून न घेतां कोरे करकरीत परत येतात. कित्येक मनानें गंजलेले पण निव्वळ पोशाखी बनलेले मला दिसतात. तेथें जाऊन पाहून आलेल्या कित्येकांचीं मनें स्फूर्तीनें उंचउंच झेंपण घेतात; पण हिंदुस्थानांत आल्याबरोबर येथील परिस्थिति त्यांना निव्वळ पांचोळ्यासारखे निःस्सार बनवते. आणि मग घोर निराशा ! कित्येक तिकडील वातावरणानें धुंद होऊन सोनेरी शृंखलेची गुलामगिरी पत्करून ताठरलेल्या मानेनें आपल्या समाजाकडे कःपदार्थ म्हणून पाहूं लागतात.

# विरलेलें स्वप्न

अण्णा ! यांतलं कोणतंच चित्र मला मोह घालीत नाहीं. हेंच ना परदेशचं मानाचं वैभव ? मला त्या मान-सन्मानाची आणि वैभवाची भूल नाहीं. माझ्या असमाधानाची ज्योत त्यामुळें विझायची नाहीं. मी श्रीमंताचा मुलगा खरा, पण लहानपणापासून माझ्या भोंवतीं दारिद्र्यानें पिचून जाऊन जगण्यासाठीं धांपा टाकीत असलेल्या कर्तबगार मित्रांचा गराडा पडला आहे. त्यांना मिळणारं उत्तेजन ... पण कसलं आलं आहे उत्तेजन ? मला तर वाटतं उत्तेजन हें अमृतासारखं तारक आणि विषासारखं मारक आहे. तें कोणता परिणाम घडवून आणणार हें निश्चित माहीत नसतांना कुणी कुणाला उत्तेजन देऊन भरीस पाडूं नये. त्या उत्तेजनानें मद चढून आपला शीणभाग विसरून पुढें पळावं तों कुणाच्या नशिबीं सिंहासन आणि कुणाच्या नशिबीं स्वतःलाच पुरून घ्यायला खोल खड्डा खणलेला आढळतो ! सगळ्या कर्तबगारीवरचा विश्वास उडवून टाकणारी विचित्र परिस्थिति सर्वांच्या माना आंवळून बसलेली दिसते. अशा प्रसंगीं नको तिथें धडक घ्यायला लावून कर्तबगारीवरचा विश्वास तरी उडवूं नये.

आशेनें आणि उत्साहानें फुलून धडक घ्यायला निघालेल्या तरुणांची सारी चित्शक्ति मरून जायला



[illegible stamp]

कांहीं कारण असेल तर खोटा आशावाद आणि खोट्या-बद्दलचा आशावाद !

मला जर कुणी विचारलं कीं तूं दुसऱ्याला काय उपदेश करशील तर या पिळून काढणाऱ्या परिस्थितीकडे बघून मी त्याला म्हणेन – " बाबा, तूं जगायला शीक. " " मानसन्मानानें जगायला शीक " असंसुद्धां मी म्हणणार नाहीं; कारण मानसन्मान हा केवळ चांगल्या गोष्टींवर आधारलेला आहे असं मला दिसत नाहीं.

अण्णा ! तुम्हांला कल्पनाहि नसेल माझं मन मला किती खाऊं लागतं याची. माझ्यापेक्षां दसपटीनें गुणवान् असे माझे दरिद्री मित्र आहेत. मी बोललों नाहीं तरी माझ्या अंतःकरणांत त्यांची किंमत मला कळते. मी सहजा-सहजीं जें करूं शकतों तें त्यांना परोपरीनें धडपडून मिळत नाहीं. असं कां तें मला कळतं. संपत्ति आणि गुण यांचं व्यस्त प्रमाण मला टोचतं. हें असलं संपत्तीचं वैभव आणि असल्या संपत्तीचा मानसन्मान !

मला आठवतं आहे त्या दिवशीं जातीच्या जोरावर एक मठ्ठ पोरगा परीक्षेंत माझ्या वर आला तेव्हां तसल्या पक्षपातानें माझं मस्तक खवळून गेलं. त्याच

दिवशीं राजीव गरीबीमुळें स्वतःची सारी कर्तबगारी कशी मातीमोल होत गेली हें सांगायला लागला आणि मला एकदम वाटलं — या जातिभेदाबद्दल मला इतका सात्त्विक संताप आला, मग सदैव फत्तरावर टकरा घेणाऱ्या व हातीं कांहीं न लागणाऱ्या गरिबांना किती संताप येत असेल. मला एकदम या गोष्टीची जाणीव झाली कीं — एकदां माझ्या मार्गांत आलेल्या या परजाती-बद्दल माझ्या मनानें माझं कायमचं नुकसान झाल्याची अढी घेतली,. मग प्रतिदिवशीं आमच्या सधनतेच्या जोरावर आम्ही कितीक जीवांच्या आड येऊन त्यांना जगणं अशक्य करून सोडतों आहों त्यांनीं काय करावं ?

(५)

आम्हां सर्वांच्या भोंवतीं उदो-उदो करीत हिंडणाऱ्या या माणसांकडे मीं पाहिलं म्हणजे मला नेहमीं वाटतं कीं हा केवळ पैशांचा मोलाचा मान आहे. कोणता गुण आहे यांत ? इतक्या कुळांना पद्धतशीर कसं पिळावं हें माझ्या वडिलांना ठाऊक आहे हाच का गुण ?

बायको घरांत बाळंत आहे, चिल्या-पिल्यांच्या पोटांत घालायला अन्न नाहीं, तरीहि कांहीं मिळेल या आशेनें त्या साऱ्यांच्या कष्टानें शेत पिकवूं पाहणारे हे शेतकरी जेव्हां दाराशीं केंविलवाण्या चेहऱ्यानें बघत बसतात, तेव्हां मला कधीं-कधीं वाटतं कीं खून हा कायद्यांत गुन्हा आहे, चोरी हा गुन्हा आहे, पण कायद्याच्या कात्रींत न सांपडतां अस्सल खुनी माणसाला अथवा दरवडेखोराला लाजवतील असे खून आणि दरवडे आम्ही घालतों आहों. भुकेकंगाल होऊन मेलेला शंकर धुमाळ ! त्याची आठवण झाली तरी मला वाटतं हा मुका खून आम्हीं केला असं. सबंध जन्मभर झिजून त्यानें आम्हांला पोसलं ! आणि शेवटीं तो मेला तो आमच्याच कर्जात ! म्हणून बायका-पोरांना देशोधडी लावून आम्हीं

त्याच्या जमिनीच्या तुकड्यांचा कबजा घेतला ! याला 'खून' 'दरवडा' याशिवाय काय नांव द्यायचं ? असल्या नीतिमत्तेवर मिळविलेल्या वैभवाचं प्रदर्शन म्हणून मीं विलायत गांठायची ! आणि तिकडून आल्यावर यांच्याकडे माझी मेहेरनजर म्हणून टाकायची ! मला या साऱ्या प्रकाराची चीड आहे.

ही पद्धतशीर चाललेली अनीति मी जेव्हां अण्णांच्याजवळ बोलून दाखवितों तेव्हां ते मला मूर्ख, व्यवहारहीन समजतात ! आणि त्यांचं असलं जीवन हा मात्र व्यवहार !

( ६ )

आईला वाटतं एकदां मी संसाराच्या खुंटाला स्वतःला बांधून घेऊन जन्मभर घेरी येईपर्यंत फिरत राहावं. मला हीच कल्पना असह्य होते. आपल्यांतील वधू-वरांना निवडीचें क्षेत्र किती मर्यादित आहे. जातीचीं बंधनें तर आहेतच; पण एकजातीयांतहि कमी-अधिक सधनतेमुळें निवडीचें क्षेत्र कितीतरी संकुचित होत जातं. स्त्री-पुरुषाला एकमेकांबद्दल वाटणारं आकर्षण हा विवाहाला पुरेसा बंध होतच नाहीं. नुसत्या आकर्षणावर विश्वास ठेवून वधूनें गरीब वराची निवड करणं म्हणजे व्यावहारिक दृष्टीला पारखं असणं असंच समजलं जातं. पण व्यावहारिक दृष्टि म्हणजे तरी काय? श्रीमंती पाहण्याची दृष्टि. त्यामुळें कित्येक वेळां – नव्हे बहुतेक वेळां – ही व्यावहारिक दृष्टि आपल्या निवडीचें क्षेत्र अत्यंत आकुंचित करीत जाते. मग स्त्री आपल्याला आवडणारा सहचर न निवडतां सांपत्तिक दृष्ट्या स्थिरस्थावर असलेला सहचर निवडते. हीं लग्नें सामाजिक दर्जा किंवा पैसा यांच्याशींच होतात. आणि हें सर्वांना कळत असतं. मन किंवा गुण यांपेक्षांहि पैशानें जी विशिष्ट राहणी बनत जाते ती आपल्याला सोईची आहे हें पाहिलं जातं. ती विशिष्ट राहणी किंवा

तो सामाजिक दर्जा दरिद्र्याला नको असतो किंवा त्याला तो पाळतां येणार नाहीं असं थोडंच आहे? पण आर्थिक विषमतेमुळें त्याला ती गोष्ट अशक्यप्राय होऊन बसते.

सांपत्तिक विषमतेमुळें झालेले विजोड विवाह गुणांच्या दृष्टीनें सकस प्रजा निर्माण करूं शकत नाहींत. मीं हे प्रकार इतके पाहिले आहेत कीं त्याच त्या मेळांत जाऊन बसण्याचा मोह मला होत नाहीं.

(७)

या मार्गाला कधीं मी लागेन असं मला स्वप्नांतसुद्धां खरं वाटलं नसतं. स्त्री! त्यांतून सुशिक्षित स्त्री! तिच्याबद्दल माझ्या इतक्या विलक्षण कल्पना आहेत खरोखर! पण मन रोहिणीला अपवाद करूं पाहतें आहे. ती खरोखरच अपवाद असेल का? का ही क्षणभर मनाला आलेली झांपड आहे? किती विलक्षण ओढ ही! मला माहीत आहे ही जात कसली आहे ती. पुरुषाबद्दल अत्यंत अविश्वास बाळगणारी, स्वतःच्या विश्वांत स्वतःच्या मोठेपणानें रंगून गेलेली, नमणाराला लाथेनें झुगारणारी आणि तिच्याशीं फटकून वागणारापुढें अत्यंत नरमाईनें वागून त्याला वश करूं पाहणारी-साऱ्या डांवपेचांत तरबेज असलेली ही जात आहे! सगळं खरं; पण मी जेव्हां-जेव्हां रोहिणीकडे पाहतों अगर तिच्याशीं बोलतों तेव्हां सामान्यतः इतरांत भासणारा नटमोगरेपणा हिच्यांत नाहीं असं मला वाटतं. रोहिणी माझ्याशीं बोलते आणि मीहि तिच्याशीं बोलतों. पण भीतीनें अस्वस्थ होतं मन. तिच्याबद्दल मला यत्किंचित्हि कुतूहल आहे असं तिला कळलं तरी ती माझी अवहेलना करूं लागेल. मला माहीत आहे स्त्रियांची जात!

## (८)

जीवनाचा हेतु काय हें मला खरोखर सांगतां येत नाहीं. पण मी कसा-कसा जगत आलों हें मी पाहतों तेव्हां मला वाटतं कीं अगदीं लहानपणापासून आतांपर्यंत माझी धडपड माझ्या जीविताच्या नाटकाचा नायक शोधण्यासाठीं चाललेली आहे. "आतां हा सांपडला" असं म्हणून ज्यांच्या-ज्यांच्याकडे आदरानें व स्तिमित दृष्टीनें मी पाहत आलों, तेथें क्षणभर असं वाटलं "कळला जीवनहेतु. हें असं व्हायचं आहे आपल्याला." पण जरा जवळ जाऊन पाहिल्यावर जेथें-तेथें दगडाचे देवच मला दिसले. नव्हे त्याहून भयंकर! खरं नाटक चालवलं आहे यांनीं जगाच्या रंगभूमीवर. अंतर्बाह्य कांहीं मेळ नसणारं नाटक करून हे लोकांना झुलवताहेत असं वाटलं आणि माझीं स्वप्नं सारखीं विरत चाललीं. आयुष्याला बांधून जखडून टाकणारं आकर्षण राहिलं नाहीं कुणाच्या बाबतींत. कुणाच्या मोठेपणाची भूल मला उरली नाहीं.

मला हंसूं येतें आहे अजून कित्येकांचे 'प्रसिद्ध' होण्याचे मार्ग पाहिले म्हणजे! प्रेसमध्यें हवे तितके खिळे

असतात. कुणालाहि ते नजरेपुढें खिळवून धरूं शकतात! थोडी पैशांची ऊब आणि कांहींसा लोकांना झुलवण्याचा गुण पाहिजे. ‘ तुम्ही मला मोठं म्हणायचं ’ ‘ आम्ही तुम्हांला मोठं म्हणायचं ’ असे हे मोठें होण्या-करण्याचे गुप्त आखाडे असतात! सर्व मोठ्या-मोठ्यांना हें कळतं, पण न बोलायचा संकेत असतो. व्यवहार असतो तो! पण हीं दूषणें तरी कशाला द्या? त्यांच्या जीविताची ती रूपरेखा त्यांना हवी तशी त्यांनीं आंखली असेल. पण एवढं खरं कीं मला तिचा मोह नाहीं.

रोहिणी--

( १ )

एका बिंदुकल्याभोंवतीं सबंध पोतीचें तबक विणावें तसे सारा दिवस माझे सारे विचार एका व्यक्तीभोंवतीं विणले जात असतात. मला कल्पनाहि होत नाहीं कित्येक वेळां या गोष्टीची. सकाळपासून संध्याकाळपर्यंत मी कित्येक गोष्टी करीत असतें. पण त्या सर्वाला एकप्रकारचा मंदपणा आलेला असतो. एकाच व्यक्तीनें भारावलेलं माझं मन सगळ्या गोष्टींकडे किती त्रयस्थपणें पाहत असतं. सगळीं म्हणतात मी स्वभावानें शांत आहे म्हणून. पण हा सारा शांतपणा कां हें जर त्यांना कळेल तर! क्षुल्लक हालचालीनें नागासारखी फडा उभारून राहणारें माझें मन अलिकडे सारा वेळ एकप्रकारच्या तंद्रींत असतें. तीक्ष्णता काय ती एका ठिकाणीं केंद्रित झाली आहे. कोणावर रागवायला, चिडायला माझ्या मनाचीं व्यवधानेंच निराळीं असतात. मग मला राग येणार कसा? राग यायला किंवा लोभ वाटायला माझें लक्ष्य ठिकाणावर असतें कुठें?

माझ्या भोंवतीं सारा वेळ हीं मुलें गोंगाट करीत असतात. त्यांच्या गोंगाटानें कुणाचीं मस्तकें भणाणून जातात, कुणाचीं डोकीं ठिकाणावर राहात नाहींत, आणि

मला तर गोंगाट ऐकूंसुद्धां येत नाहीं. मी निवडण निवडीत असतें, नाहीं तर स्वस्थ डोळे मिटून पडतें. खोलींतील कोच खुर्च्या तशीच मी एक. घनदाट वृक्षाच्या छायेंत खुरटलेलीं कितीक झाडें जगत असतात. माझ्या मनांत एकाच विचाराच्या छायेंत कितीक विचार जगत असतात. पण ते सारे खुरटलेले. सारा विस्तार काय तो एका वृक्षाचा. कान बधिर झालेली, डोळे उघडे असून शून्यपणें पाहणारी, जिती असून मनानें निर्जीव झालेली मी ! मलाच माझें आश्चर्य वाटतें. ती सारी बधिरता, ती सारी शून्यता, तो सारा निर्जीव-पणा त्या एका माणसाच्या नांवानें कुठल्या कुठें फुंकरला जातो. एवढंच कशाला ? त्याच्या गांवाचं नांव कुणी उच्चारलं तरी साऱ्या शक्ती एकवटून येतात. आणि तो सारा गांव धुंडून माझ्या वैशाखाला त्या शोधूं लागतात. अगदीं जिभेवर येणारे शब्द मागें लोटतां-लोटतां पुरेसं होतं; इतकं कीं माझी मलाच भीति वाटते कीं मी बोलून तर नाहींना गेलें ? – त्याच्यासंबंधीं विचारलं तर नाहीं ना ? हो, साऱ्या बाबतींत इतकी शांत – खरं म्हणजे अनुत्सुक – असणारी मी ... इतक्या उत्सुकतेनें त्याची चवकशी केली, तर ... तर पण नकोच कुणाला कळायला.

## ( २ )

प्रेमानें वेड्या बनलेल्या मुलां-मुलींकडे पाहिलं कीं मला हंसूं येतं. आणि असंहि वाटतं कीं मी इतकी आंधळी होणार नाहीं कधीं. पण हें म्हणतांनासुद्धां दुसरा विचार उमटल्याशिवाय राहत नाहीं मनामध्यें. प्रत्येक व्यक्तीलाच आपलं प्रेम डोळस वाटत असतं. प्रत्येकालाच आपल्या प्रीतिबंधनांत इतरांहून कांहींतरी निराळं आहे असं वाटत असतं.

मलाहि वाटतं माझा वैशाख इतरांहून निराळा आहे. आमच्या एकमेकांच्या ओढींत निवळ भावनांपेक्षां टिकाऊ असं कांहीं बंधन आहे. दोन अपूर्ण जीवांना पूर्णता देणाऱ्या प्रेमाचं चिरंतनत्व विकारसाम्यांत नसून विचार-साम्यांत आहे. तसं असेल तरच तें प्रेम आयुष्याच्या अंतापर्यंत टिकेल. नसेल तर विकारांनीं कुजलेले ते पाश तुटत जात असल्यानेंच पुनः अपूर्णतेचं असमाधान माणसाला बोचूं लागत असेल.

प्रेमाशीं खेळ म्हणजे विस्तवाशीं खेळ. तितक्या कुशलतेनें खेळतां आलं नाहीं तर अंग भाजल्याशिवाय— होरपळल्याशिवाय राहणार नाहीं. म्हणून कित्येक वेळां

या आभासमय प्रेमाच्या एकदम आहारीं न जातां दुसऱ्याचे गुण-दोष व्यापारी वृत्तीनें निर्विकारपणें पाहून घेऊन नंतरच त्यांत स्वत्वाची भावना भरलेली बरी.

( ३ )

खुळी भीति असेल कदाचित् ही ! पण जेव्हां मी माझ्या वैवाहिक आयुष्याचा विचार करतें तेव्हां मला सारखी भीति वाटते कीं आतांपर्यंत बनत आलेल्या माझ्या आवडी-निवडी सोडायच्या कशा ? किती वेळां वाटतं कीं माझं व्यक्तित्व कायम राहिलं पाहिजे. त्याकरितां माझ्या पायांवर मीं अवलंबून असलं पाहिजे. आतांपर्यंत घांशीत-पुशीत आणलेली बुद्धि नुसती यंत्रासारख्या आयुष्यानें कुजून जातां उपयोगी नाहीं. पण या साऱ्या विचारांचा कल्लोळ उठतो तेव्हां मी अस्वस्थ होतें.

एकाकी बेटांत पडलेला माणूस दर्यामध्यें दूरवर फिरणाऱ्या जहाजाकडे आशेनें पाहतो, तशी वणवण आसरा शोधणारी माझी दृष्टि अशा वेळीं वैशाखाकडे लागते. आणि असं वाटतं तेव्हां कीं आम्हीं दोघं एकमेकांच्या व्यक्तित्वाला खुरटवून न टाकतां जगूं—सुखानें जगूं.

(४)

काय आहे कोण जाणे! त्या त्याच्या सावध वागण्यानेंच मला वाटतं मी अधिक ओढली जात आहें. त्याच्या त्या मित्रांच्या मेळ्यांत असतांना त्याची ती खेळकर वृत्ति पाहिली आणि लगेच माझ्यासारखीशीं बोलतांना त्याचा तो उदासीनपणा...छेः मला वाटत नाहीं तो उदासीन आहे असं. मुलींच्या वाऱ्यालाहि उभा न राहणारा वैशाख माझ्याकडे पाहत नाहीं असं नाहीं. मला वाटतं त्याचं लक्ष्य असतं माझ्या हालचालीकडे. तो माझ्या बावतींत उदासीन नाहीं खास! पण मग तो अजून आपण होऊन एकदांहि माझ्याशीं बोलला नाहीं! जेव्हां-तेव्हां मींच त्याला प्रथम बोलायला लावलें आहे. कदाचित् या माझ्या वागण्यानें उपहासानेंच तो माझ्याकडे बघत असेल नाहीं तर! किती कमकुवत माझं मन. साऱ्या मुलांत दृष्टि भिरभिर हिंडून त्याला शोधून तेथें स्थिरावते तरी मन आवरूं शकत नाहीं तिला. कधीं-कधीं माझी मलाच लाज वाटते अशा वेळीं. वैशाखनें उलट माझ्याकडे पाहिलं तर! पण हें असं कां होतं? त्याच्यांत कांहींतरी निराळं आहे खास. तें पाहण्यासाठींच मी त्याचं प्रत्येकाशीं बोलणं-चालणं पाहतें.

( ५ )

वैशाख ! तूं बोलूं नकोस, सांगूं नकोस. पण तुझ्या डोळ्यांत माझ्याबद्दल आत्मीयता दिसते. कधीं कधीं वाटतं त्या आत्मीयतेची साक्ष पाहावी; पण पुनः वाटतं – नको, सुखाचीं स्वप्नं विरायला नकोत. एक दिवस असा येईल कीं तुझ्या हृदयांत दबून बसलेली पण तुझ्या दृष्टींतून माझ्याकडे पाहणारी ती आत्मीयता सारे बंधारे फोडून बोलूं लागेल. किती कृत्रिमपणानें वागतोस ! मला हंसूं येतं तुझं. सहज बोलण्या-चालण्याचे प्रसंग तूं सहेतुकपणें टाळतोस. तेव्हांच मला संशय येतो. दूर-दूर जाऊनहि गरुडपक्ष्याप्रमाणें तुझी माझ्याकडे लागलेली नजर ... मी कशी बरं फसेन ?

पण ही कोंडी कुणीं फोडायची ? तूं भितोस ? मला नाहीं भीति वाटत. मला आठवतो आहे त्या दिवसाचा तो वादविवाद. कुणालासं तूं म्हटलंस—" अं: ! अरे हें तुला कळायला पाहिजे होतें. तुम्ही बायकांची खुशामत करा कीं तिरस्कार आलाच तुमच्या वांट्याला. "

वैशाख ! खुशामत नकोच, पण साधं बोलणं कां तूं मुद्दाम टाळतोस ? मी बोलेन तुझ्यापाशीं. तूं नाहींना तिरस्कार करणार माझा ?

( ६ )

मंद मंद जळणाऱ्या दिव्याच्या उजेडांत टेबलाच्या भोंवतीं दोन-तीन खुर्च्या पडल्या आहेत. टेबलाच्या कोंपऱ्यावर वैशाख बसला आहे. त्याची दृष्टि बोलतांना नुसती तेज टाकते आहे. खरोखर हें दृश्य मी कधीं विसरेनसं वाटत नाहीं. इतकी विलक्षण श्रद्धा मला माझ्या आयुष्यांत लाभेल का ? नाहीं तरी आयुष्याची नौका कोणत्या ना कोणत्या श्रद्धेच्या जोरावरच वल्हवली जाते. श्रद्धेवांचून जीवन म्हणजे मेलेलं जगणं.

चुकीचं असो वा बरोबर असो. साऱ्या आयुष्याला भुलावण घालणारं वैशाखाला कांहींतरी मिळालं आहे खास. त्याशिवाय आठवडेच्या आठवडे मिळेल तें तोंडांत टाकून, झोंप आहे तर आहे नाहीं तर नाहीं, घर ना दार अशा स्थितींतहि त्याचा चेहेरा आनंदानें फुलून राहिला नसता. हेवा वाटतो त्याच्या जीवनाचा. अजून कोणी-सुद्धां स्वतः करीत असलेल्या गोष्टीबद्दल इतक्या आत्म-विश्वासानें बोलतांना मीं ऐकलें नाहीं. जो-तो 'हें असंच चालायचं' म्हणून आयुष्याची एकेक घडी घालवीत बुरसून बसला आहे.

# विरलेलें स्वप्न

मला वैशाख आवडतो. वैशाख आवडतो म्हणण्यापेक्षां त्याच्यांतील तो एक ध्यास मला आवडतो. वॉशिंग्टन सहज लीलेनें हातांतील कुऱ्हाडीनें सुंदर-सुंदर झाडें तोडीत गेला तसा वैशाख खेळकर वृत्तीनें टीकेचं अस्त्र चालवतो तेव्हां – सुंदर – सुंदर दिसणाऱ्या अनेक संस्था व सन्मान्य गणल्या जाणाऱ्या अनेक व्यक्ती धुळीला मिळवतो तेव्हां– मला चीड येते. पण त्याच्यांतील दमदार श्रद्धा पाहिली कीं वाटतं खरं असेल हें.

## ( ७ )

कित्येकदां मन गांगरून जातं भविष्यकाळचीं चित्रं रेखाटायला लागलं म्हणजे. करायचं काय पुढें ? शिकायचं, मिळाली संधि तर पोरी पढवीत बसायचं, नि वेळ काढायचा कुठें तरी. नाहीं तर सदान्‌कदा लग्नासाठीं माळ हातांत घेतलेलीच असायची. संधि सांपडली कीं डोळे मिटून किंवा उघड्या डोळ्यांनीं कुणाच्या तरी गळ्यांत घालून संसार थाटायचे !

आणि ते संसार तरी काय ? माझ्या बरोबरीच्या कितीक मुली मला त्या संसारांत पिचून गेल्यासारख्या वाटतात. स्वयंपाक करून घालून प्रजावृद्धि करणारी ती पत्नी आणि घरांत पैसा आणून टाकून आपल्या मनाची भूक भागवण्यासाठीं घराबाहेरचे बौद्धिक पाश गोळा करीत हिंडणारा तो पति ! संसारासाठीं एकत्र आलेलीं हीं माणसं संसारांतल्या पहिल्या पावलालाच मनानें विभक्त होऊं लागत असावीं असं मला वाटतं. पण कदाचित् स्वतःच्या सुशिक्षितपणाची कसोशीनें काळजी घेणारं माझं मन विनाकारण दुसऱ्याचे संसार पिचले असल्याचा आभास निर्माण करीत असेल !

( १ )

तुला मीं किती वेळां तरी विचारलं आहे कीं तुझी माझ्याबद्दलची ही ओढ कां निर्माण झाली ? तूं म्हणतेस ती माझ्या गुणांमुळें निर्माण झाली. तूं असं म्हटलंस तरी मला धक्का बसतो एक प्रकारचा. रोहिणी ! तूं आंधळेपणानें पाहते आहेस माझ्याकडे असं मला वाटतं. अजून निर्भेळ गुणांची किंमत आपल्या इकडील लग्नाच्या या बाजारांत आली आहे असं मला वाटत नाहीं. कारण मला उघड-उघड दिसतं आहे कीं या सांपत्तिक विषमतेमुळें दारिद्र्याचं लक्तर पांघरून बसलेल्या गुणांकडे कुणाचं लक्ष्यच जात नाहीं. उलट सुवर्णाच्या कांतीनें गुणहीनांवरसुद्धां गुणांचा आरोप केला जातो. समाजांत प्रत्येक गुणी मनुष्य आपलें शीर वर ठेवायचा अस्खलित प्रयत्न करीत असतो; पण संपत्तीच्या जोरावर सर्वांना मागें टाकून त्यांच्याच खांद्यावर आपलें ओझें उभें करून समाजाच्या डोळ्यांत गुणहीन श्रीमंत भरूं शकतो. तुझं असंच नसेल ना ? खरी स्पर्धा, खरी गुणांची कसोटी ही सारखीच सांपत्तिक स्थिति उपभोगणारांतच लागू शकेल. माझ्यांत तूं काय पाहिलंस ? माझे गुण ? मला कित्येक वेळां वाटतं कीं गुणांसाठीं नाहीं ही ओढ. गुणांच्या आभासावर तूं भुलते आहेस.

( २ )

मला माझ्या भोंवतालचं जग कुजत पडलेलं दिसतं. त्यांनीं केलं तेंच करीत राहून कुजूं ? तुझ्या कल्पनेप्रमाणें मी इतिहासाचा एक नामांकित प्रोफेसर झालों, तर तुला आनंद वाटेल का ? माझ्या वडलांच्या श्रीमंतीच्या सुखांत लोळत न राहण्याबद्दल तूं मला सांगतेस तेव्हां मला हंसूं येतं. त्याबरोबरच तूं उपाय म्हणून सांगतेस त्याचा मोठेपणा तुला कसा मोहवून ठेवतो याचंहि मला आश्चर्य वाटतं. मला तसल्या जीविताचा वीट आहे. इंग्लंड, अमेरिका, जर्मनी या देशांतून येऊन तेथील गुरुशिष्यांच्या खेळीमेळीची आणि खेळीमेळींतूनहि शिष्यांना गुरूबद्दल वाटत असलेल्या प्रेमादराची आमचे लोक तोंड भरून स्तुति करतात आणि आपल्या विद्यार्थ्यांवर 'बेजबाबदार' म्हणून मुद्रा ठोकतात. तेव्हां त्यांना विचारावंसं वाटतं कीं ज्यांचीं उदाहरणं देऊन तुम्ही सांगत असतां त्या प्रोफेसरांच्या इतका मनाचा ताजेपणा, ज्ञानाचा, बुद्धीचा, भावनांचा ताजेपणा तुमच्यांत कुठें आहे ? उतार वय झालें असतांहि जगाच्या कोना-कोपऱ्यांतून ज्ञानगंगा विद्यार्थ्यांना आणून पाजण्याची त्यांची नित्याची धडपड पाहिल्यावर विद्यार्थ्यांना प्रेमादर

कां वाटूं नये त्यांच्याबद्दल ? गुरुभक्ति हीसुद्धां अंतःकरणाच्या व बुद्धीच्या भूमींतच रुजते.

सारा जन्म ज्ञानाचे कण आणि कण गोळा करून केस पिकल्यावर आणि अनुभवांत मुरल्यावरच त्या ज्ञानवृद्धाला तिकडे 'प्रोफेसर' म्हणतात. आणि इकडे ...? 'प्रोफेसर' म्हटला कीं त्या-त्या विषयाचा तो अधिकारी म्हणून त्याच्याकडे सगळें राष्ट्र तिकडे पाहतें. आणि आमच्याकडे ...? जो सगळ्या जिवंत चळवळीपासून अलिप्त, आपल्या छोट्या विश्वांतहि स्वतःपुरताच कोश करून डोळे झांकून पडणारा तो आमचा प्रोफेसर. शिक्षणांत जीवनांतील साऱ्या विषयांचे धागे अगर मुळें असतात. अशा स्थितींत समाजकारण, राजकारण, धर्मकारण – नव्हे देशहिताचा हरएक प्रश्न सोडवायला जिवंतपणें विचार करणारे, त्यांतील आजतागायत ज्ञान असणारे कोणी असायला पाहिजे असतील तर ते प्रोफेसरच. पण आमचे प्रोफेसर प्रोफेसरी मिळाल्यापासूनच निःसंग. त्यांच्यांत निर्मितीची शक्तिच राहत नाहीं. अकरा वाजतां धुक्याच्या बुरख्यांत उगवून पांच वाजतां मावळायचे. त्यानंतर त्यांचें तेज नाहीं.

हे सारे प्रोफेसर कधीं एके काळीं पाठीशीं बांधलेल्या शिदोरींतून घांस-घांस देत बसले आहेत कृपणासारखा

विद्यार्थ्यांना. त्या घासांनीं ताजें रक्त निर्माण करणारी ताज्या अन्नाची भूक कशी भागणार त्यांच्याकडून? हे प्रोफेसर तर नव्या जगाच्या दृष्टीशीं दृष्टि भिडवितांना कातर होतात. त्यांच्यांतलाच एक होऊन आपलें आसन स्थिर करण्याच्या प्रयत्नांत बुद्धि गंजवून टाकायला मी तयार नाहीं!

पण असं मी म्हणतों तेव्हां माझं मलाच हंसूं येतं. परिस्थितिशरण होऊन पोटासाठीं धावणारे आमचे लोक. त्यांच्यांत जोम तरी कसा भरणार? प्रोफेसर, वकील, शिक्षक, ... छेः! कसलाच मोह होत नाहीं मला. एकप्रकारची चीडच येते त्या सर्वांची!

## ( ३ )

रोहिणी, मला प्रांजळपणें वाटतं कीं आपल्याभोंवतीं पडलेल्या दडपणाचा तूं विचार केलास कीं 'मोठेपणा'-च्या तुझ्या कल्पना ढांसळून पडतील माझ्याप्रमाणेंच. तुला ध्येयशील आयुष्याची भूक आहे म्हणतेस? मला सांग मला कोणतें ध्येय ठेवतां येईल? आणि ध्येय म्हणजे तरी काय? तुझी अशी का कल्पना आहे कीं जीं ध्येयशाली माणसं आपण म्हणतों त्यांच्या ध्येयाच्या कल्पना जन्मजात रेंखीव असतात?

मला तर असं वाटतं कीं मनांत आधीं सगळंच निराकार असतं. ध्येयवादी माणसालाहि शेवटपर्यंत आपली ध्येयमूर्ति परिपूर्ण, रेंखीव, साकार, सावयव अशी दिसत नाहीं. आपण मात्र असं म्हणतों कीं त्याला पहिल्या पासूनच ती रेंखीव दिसत होती. अस्पष्ट कल्पनांना आकार देण्याचं आणि जीव भरण्याचं काम आयुष्याच्या अंता-पर्यंत मनुष्य करीत असतो. ज्याच्या मूर्तीला आकार दिसेल तो ध्येयवादी ठरतो. जन्मभर रक्त आटवूनहि ज्याची मूर्ति साकार होऊं शकली नाहीं व लोकांच्या दृष्टिपथापुढें आली नाहीं तो ध्येयहीन ठरतो. मला

निराशावादी म्हण हवा तर. पण ध्येयवादी माणसांचीं ध्येयें तरी चिरंतन कुठें राहूं शकतात ?

ध्येयें – विशिष्ट ध्येयें – पुढें ठेवून चालविलेल्या संस्थांचे इतिहास पाहा अगर व्यक्तींचे इतिहास पाहा. जमिनींत पुरून ठेवलेला ठेवा जसा हळूं-हळूं आपलें स्थान पालटत जातो अगर नदीचें पात्र जसें हळूं-हळूं बदलत असतें, तशीच या संस्थांच्या व मनुष्यांच्या ध्येयांची स्थिति मला दिसते.

## ( ४ )

करीत राह्यचं आणि केलेलं क्षणार्धांत मोडलेलं पाह्यचं! कसं लाभणार त्यांत समाधान? त्यापेक्षां असं वाटतं एकच अवाढव्य चित्र रंगवायला घ्यावं. प्रत्येक कुंचलीबरोबर उमटत जाणाऱ्या त्या अपूर्ण चित्राचा प्रतिदिनीं उमलता आनंद लुटीत राहावं, आणि तें चित्र पूर्णतेला पोहोंचतांच – त्याच्या पूर्णतेचा आनंद ओसरायच्या आंतच – आपलं आयुष्य संपावं. जगण्याची अनिवार आशा आहे तोंच आयुष्य संपण्यांत मौज आहे.

उत्पत्ति स्थिति आणि लया! या तिहींत अत्यंत जाचक म्हणजे स्थितिच. पूर्णता टिकवून धरण्याचा अट्टाहास व त्यांत होणारी कुचंबणा यामुळेंच जीविताचा वीट येतो. जीवन म्हणजे आशा-निराशेचा गोफ, भुलावण आणि सावधतेचा खेळ. अल्प काळ मनाला भुलावण चारून ती उतरल्यावर दीर्घकाल तिच्याबद्दल पश्चात्ताप करीत बसण्यापेक्षां साऱ्या आयुष्याला बुडवून टाकणारी भुलावण जो शोधून काढील तोच जोमांत जगूं शकेल.

(५)

मनुष्याचं सगळं आयुष्य म्हणजे मायेच्या व श्रद्धेच्या दोरखंडांनीं साऱ्या बाजूंनीं खेंचून जमिनीवर उभ्या केलेल्या खांबासारखं असतं. आई, वडील, इष्टमित्र यांच्याबद्दल कमी-अधिक प्रमाणांत माया, आणि परंपरा, चालीरीती इत्यादिकांवरील श्रद्धा – या तणाव्यांमुळें आपोआप खेंचला जाऊन उभा राहिलेला माणूस हे सर्व तणावे ढिले पडल्यावर गदगदां हालत राहतो जागच्या जागीं. धड तोल जाऊन पडतां येत नाहीं, धड दृढतेनें उभं राहतां येत नाहीं. मग अस्थिरपणें एकदां इकडे एकदां तिकडे झुकत राह्यचं! आणि सगळा वेळ पडण्याची भीति! मला नको आहे हें! सारे निर्जीव तणावे कापून तरी टाकावे, नाहींतर स्वतःला पुरून घेऊन स्वतःच्या दृढतेच्या आत्मविश्वासावर जगावें.

कधीं-कधीं तशा अस्थिर डोलण्यांतहि आनंद असतो; पण कुठपर्यंत? मनाला पुढचीं मागचीं चित्रं पाह्यचीं नसतात तेव्हां. हरघडी आपल्याला खेंचून धरणारी मायेची वा श्रद्धेची दोरी कांचलेली दिसते तेव्हां तिच्या आसऱ्याचा विश्वास पटत नाहीं आणि नवे तणावे बांधण्यासाठीं जीव तळमळूं लागतो!

# विरलेलें स्वप्न

या सध्यांच्या पाशांनीं मला मी दृढतेनें उभा राहीन असं वाटत नाहीं; म्हणून सारखी अस्वस्थता गांगरून टाकते. सारे तणावे कांचले आहेत — कांहीं माझ्या अविश्वासाची रग लागून आणि कांहीं स्वतःच्या जुनाटपणानें कांचले आहेत. रोहिणी ! अशा वेळीं तुझी आठवण येते. हे सारे जीर्ण पाश तोडून टाकून नव्या श्रद्धेचे पाश तुझ्या आधारानें, सहकार्यानें मी तेव्हांच उभे करूं शकेन.

( ६ )

मी एकादे वेळीं भलत्याच सुखस्वप्नांत गुंग होतों. तुझ्या आणि माझ्या मिळून बनलेल्या विश्वांत रंगून जातों. कितीक गोड प्रसंग कल्पनेनें निर्माण करतों. आपल्या दोघांच्या जीवितांचे ओघ एकत्र मिळून डोंगर कडेपठार कशाला न जुमानतां धाड्धाड् धांवत जात आहेत अशीं मला स्वप्नं पडतात. पण लगेच मी जागा होतों.

या आसावलेल्या मनोवृत्तींची तृप्ति कधीं होईल का? त्या मनोवृत्तींना तुझें भक्ष्य घेऊन तृप्ति होणार नाहीं. कधीं-कधीं माझ्या सुंदर भविष्यकालाचीं मनोरम चित्रें तूं माझ्यापुढें रंगवीत बसतेस तेव्हां मी हंसतों मनाशीं. मांजर जसं उंदरावर मृत्यूचे पाश टाकल्याची खात्री करून घेऊन खेळत बसतं तसा मी तुझ्याशीं खेळतों आहे प्रेमाचे पाश टाकून असं मला वाटतं. रोहिणी! तूं कितीहि चित्रं माझ्यापुढें उभीं केलींस तरी तीं मला मेलेलीं दिसतात. दिवाळींत हातभर उंचीच्या किल्ल्याभोंवतीं निष्प्राण इवलाले सैनिक उभे करून त्यांच्या मुजऱ्यांनीं खेळांतील राजाला अभिषेक करणाऱ्या मुलांच्या समाधानांत आणि तुझ्या समाधानांत फरक काय आहे तें

मला कळत नाहीं. हे मोठे-मोठे लोक जिकडे-तिकडे असेच खेळांतल्या किल्ल्यांचे राजे बनलेले मला दिसतात. माझें त्यांत समाधान होत नाहीं. त्यामुळेंच कधीं-कधीं वाटतं–नको ह्या प्रेमाच्या पाशाची भुलावणी तुला चारायला.

( ७ )

तूं मला मोठ-मोठ्या साहित्यिकांचीं नांवं घेऊन सांगतेस कीं तुम्ही असं लिहा म्हणून. मला हंसूं येतं तुझ्या या साऱ्या अट्टाहासाचं आणि कींवहि येते. रोहिणी ! मोत्यें वेंचायला पाहिजे असलीं तर प्राण संकटांत घालून समुद्राचा तळ गांठून शोधावा लागतो. मोठेपणा पाहिजे असल्यास सारं जीवन ढवळून पाह्यला पाहिजे. त्याशिवाय खरा मोठेपणा येणार नाहीं. तें साहस ज्यांच्यांत नाहीं त्यांनीं नकली मोत्यांचं प्रदर्शन करून श्रीमंती कशाला दाखवायची ?

मी जेव्हां-जेव्हां आमच्यांतील मोठ-मोठ्या ललित लेखकांचीं पुस्तकें हातीं घेतों तेव्हां मला लहानपणच्या भूगोलाच्या तासाची आठवण होते. तो लाकडाचा लहानसा चंद्र, लहानशी पृथ्वी आणि सूर्य आमच्या छोट्या वर्गांत आणून आमचे मास्तर आकाशांतील बुद्धि गुंग करून टाकणाऱ्या अतर्क्य ग्रह-ताऱ्यांच्या घडामोडी सांगत. त्यामुळें त्यांची खरी कल्पना येणें तर बाजूसच राहिलें, पण त्या लाकडी लहानशा ठोकळ्यांकडे पाहून तेजानें फुललेल्या ताऱ्यांच्या काल्पनिक चित्राचाहि विरस

होऊन जाई. असाच विरस होत नाहीं का हीं पुस्तकं वाचतांना ?

पक्ष्यानें उंच उडायचं मनांत आणलं तर जमिनीला चिकटून धरणारे पाय पोटांत लपवून पंखांत जोर भरावा लागतो. आमच्या ग्रंथकारांना भरारी मारण्याची हौस असली तरी पाय जमिनीपासून सुटत नाहींत. परंपरेचीं घुंगुरं पायांत बांधून जागच्या जागींच नाचत बसल्यावर कितीसे लोक पाहणार यांच्याकडे ?

## (८)

शब्द ! शब्द ! शब्द ! मला इतकी व्यर्थपणाची भावना आली आहे या शब्दांची ! कित्येक वेळां वाटतं मुखांतून निघणारा प्रत्येक शब्द साकार आणि सावयव होऊन राक्षसासारखा ओरडून सांगेल लोकांना कीं माझा जन्म केवळ बोलणाराच्या ओंठावरचा आहे. याच्या हृदयांतील एकहि भावना माझ्यांत उतरली अगर मुरलेली नाहीं. खरंच, बेफामपणानें व बेजबाबदारीनें उच्चारलेला प्रत्येक शब्द असा सजीव होऊन मनुष्याचं अंतःस्वरूप किती नकली आहे याचं प्रदर्शन करील तर ? तर हजारों – नव्हे लाखों लोकांची या शब्दांच्या आहारीं जाऊन अंधपणानें होणारी आयुष्याची फसगत चुकेल. असत्य आणि वाणी यांच्या दिमाखानेंच मनुष्य हा पशूंपासून आपण निराळे आहोंत असें भासवण्याचा प्रयत्न करतो. म्हणूनच मला कांहीं बोलायला नको आहे. नकोत ते शब्द. मग तुला माझ्याबद्दल काय कल्पना करायची असेल ती कर. तुला केवळ माझे शब्द हवेत ? त्यांसाठीं तूं भुकेली आहेस ? शब्दांच्या भुलावणीचा हा पडदा तुला आयुष्यभर

थोडाच रमवणार आहे ! एक दिवस असा येईल कीं हें शब्दांचें आवरण आपोआप फाटून कदाचित् तुझ्या आशा-इच्छांना होरपळून टाकणारें असेंच केवळ माझें अंतःस्वरूप तुला दिसेल. आणि त्यानंतर तुझी होणारी फसगत ! ती किती भयंकर आहे याची तुला कल्पना नाहीं.

परिस्थितीच्या आरशांत माझंच अंतरूप जेव्हां मी पाहूं लागतों तेव्हां तें इतकं बेडौल दिसतं. अशा वेळीं मला कळत नाहीं हा बेडौलपणा परिस्थितीच्या दोषानें दिसतो कीं मुळां-तच तें रूप बेडौल आहे ! आरसा समोर धरून पाहणारा कुरूप माणूससुद्धां क्षणभर आपल्या रूपाचें कौतुक करण्या-साठींच आरशांत पाहतो. कित्येक वेळां त्याला आरशाचं भिंगच सदोष आहेसं वाटतं. पण माझी खात्री मात्र तशी पटत नाहीं. माझं रूप जेव्हां-केव्हां मी पाहूं लागतों तेव्हां माझा मूळचा बेडौलपणाच माझ्या अधिक प्रत्ययाला येतो. कुठचं ध्येय आणि कुठली ध्येयप्रीति ! अशा साशंक वृत्तीनें उच्चारलेल्या शब्दांना जोर तरी कसा येणार ? मला नाहीं फसतां नि फसवतां येत. सुंदर भविष्यकालाचें मंदिर निव्वळ बेगडी शब्दांचा मुलामा चढवून सोन्याचें भासवण्याचा मोह मला नाहीं.

# विरलेलें स्वप्न

तुझी रुखरुख मला कळते. पण नुसत्या शब्दांची भुलावण ही विषाच्या पेल्यासारखी आहे. तुझ्या ओंठाला तो पेला लावण्यापूर्वींच मला विचार केला पाहिजे. तूं एकदां तिचा घोंट घेतलास कीं त्या शब्दांचें जहर तुझ्या गळीं उतरण्याच्या आंतच माझ्या मृत्यूची...होय, या शब्दांच्या भुलावणीनें सुरूं केलेल्या संसारांतलें पहिलें पाऊल हें दोघांच्या मनाचा मृत्युच नाहीं कां ओढवून आणणार ?

रोहिणी—

( १ )

सारं जग तुझ्याकडे आदरानें पाहत आहे असं दृश्य मला दिसेल का? वैशाख! खरं सांगूं? जेव्हां मी एकटी-एकटी बसून माझ्या आवडत्या खिडकींतून बाहेर पाहतें तेव्हां अलिकडे मधून-मधून तुफान वारा वाहात असतो. त्या तुफान वाऱ्यानें मारे सारीं झाडं पिंगा घालायला लागतात. काळेकुट्ट ढग दाही दिशांनीं जणूं सैरावैरां धांवून येत असतात आणि तें शांत-शांत असणारं तळं...त्याच्याहि अंतःकरणांत खळबळ उडून साऱ्या शरीरभर लाटा उसळायला लागतात त्याच्या. तेव्हां मला कौतुकाचं हंसूं येतं. असं हादरवून टाकील का सारं विश्व माझा वैशाख? वैशाख! असाच काळ्याकुट्ट ढगांना तूं पिटाळून आण. आणि मग स्तब्ध भेदक दृष्टीनें त्यांच्याकडे पाहून त्यांना अश्रू ढाळायला लाव. सारे पिंगा खेळणारे वृक्ष स्तब्ध माना ठेऊन त्या दृश्याकडे बघतील,...आणि मी? मी अशीच कौतुकानें हंसत राहीन. तुला नाहीं का हें पटत? मला नकोत रे ते चिमणी-कावळ्याचे संसार! केवळ त्या चार भिंतींतील सुखदुःखांनीं मी गुदमरून जाईन.

( २ )

सारा दिवस मी पाहतें आहें. सकाळच्या प्रहरीं धुकं पसरतं. सान्या वस्तू अस्पष्टपणें अस्तित्वांत असलेल्या दिसतात. तुझ्या बद्दलच्या विचारांचं धुकं माझ्या सान्या दिवसाभराच्या कृतींना घेरून टाकतं. दिवसाचे क्षण लोटतां लोटत नाहींत. संध्याकाळ झाली कीं तुझ्या वाटेकडे नजर लावून मी बसतें. तूं आतां दिसशील म्हणून दूरवर त्या रस्त्याच्या टोंकाकडे मी नजरेचा पाश टाकून बसतें. तेथेंच दूरवर असणारीं तीं झाडं. किती खोडसाळ तीं ! माना हालवून जणुं मला खूण करीत असतात 'आला' 'आला', पण कांहीं नाहीं. शेवटीं कंटाळतें अगदीं. 'मी येईन' म्हणून कशाला सांगितलंस ? मीं मनाशीं आज ठरवून ठेवलं होतं तुझ्यावर कसं-कसं रागवायचं तें. मला माहित आहे तुझ्यावर रागावण्यानेंच मी तुझ्या जवळ अधिक येणार आहें. एका बाजूनें लटके राग आणि दुसऱ्या बाजूनें मनापासून रागाची समजूत काढण्याचा प्रयत्न – ह्या खेळांत दिवस नि दिवस जातात. त्रयस्थपणें पाहिलं तर किती हास्यास्पद आणि पोरकट खेळ हा. पण त्या पोरकट खेळांनींच मायेचीं जाळीं विणून वणवण हिंडणारे जीव गुंतून राहत असतात.

( ३ )

वैशाख,! तूं रागावलास होय माझ्यावर ? मी तुला "मोठा हो' म्हणतें तेव्हां माझी काय भावना असते ती नाहीं का रे तुझ्या लक्ष्यांत येत ? तूं कां बरं रागावतोस ? तुझ्या त्या डोळ्यांतील तेजस्विता पाहिली कीं माझ्या आशा नुसत्या फुलून निघतात. केवळ पोटासाठीं सहा-सहा तास खपून उरल्या-सुरल्या वेळांत बायका-पोरांत नि मित्रमंडळांत विलीन होऊन राहणारा आंधळ्या जीवनाचा वैशाख नको आहे मला. आपल्या अंतरंगांतील धगधगलेल्या अग्नीनें अनिष्टाची होळी करणारा वैशाख मला हवा आहे. उगीच का माझ्या आशा तुझ्यावर टांगून राहिल्या आहेत ? तुझ्या डोळ्यांतील दीप्ति मला सांगते कीं तुला हवं तें इथें आहे, फक्त त्यावर राख बसली आहे. तूं फुंकर घाल, कीं सारा अग्नि धाड्-धाड् पेटूं लागेल. वैशाख! तुझ्या सामर्थ्याचा विश्वास वाटतो मला. अशा वैशाखाची मी आहें हें म्हणवून घेण्यांत मला भूषण वाटतं.

(४)

असं काय होतं आहे मला आज? कुणी आनंदानें बोलत असलं माझ्याजवळ तरी मला अधिकच खचल्या-सारखं होतं, आणि वाटतं हिला मोठ्या खुषींत बोलावसं तरी कसं वाटतं? किती सहजासहजीं आयु-ष्याच्या सुखावर विश्वसून आनंदांत डुलते आहे ही! कुणी गंभीर चेहऱ्यानें गंभीरपणें कांहीं बोलूं लागलं कीं ती रुक्षताच मला टोंचूं लागते. अशा वेळीं वाटतं आहेत सराटे पसरलेले पुरेसे मला टोंचायला, कां गंभीर बोलण्यानें आणखी त्रास देते आहेस मला? बोलणं, चालणं, हंसणं, सारं कर्तव्य म्हणूनच करावयाचं का? खरंच, या साऱ्या गोष्टी कर्तव्य म्हणूनच मी करतें. तसं करणं भाग नसतं तर मी एकटी-एकटी खिडकींतून दिसणाऱ्या झाडाकडे नि निळ्या आकाशाकडे दृष्टि लावून स्वप्नें पाहत राहिलें असतें. त्या मंद-मंद मेघांचं अंतःकरण माझ्यासारखंच बधिर झालेलं मला दिसतं. तें हळूं-हळूं डोलणारं झाड, तें सुद्धां कर्तव्य म्हणूनच डोलतांना दिसतं. म्हणून स्तब्ध मनःस्थितींत असणाऱ्या त्या ढगांकडे नि झाडांकडे मी तासन् तास पाहत बसतें तरी मला कंटाळा येत नाहीं.

आम्ही परस्परांविषयीं पूर्ण उदासीन असतों. म्हणूनच मला त्यांचा जिव्हाळा आहे. कर्तव्य म्हणून आम्ही हंसत नाहीं, कर्तव्य म्हणून बोलत नाहीं. शून्य दृष्टीनें पाहिजे तर पाहावं, नाहीं तर नाहीं. अशा स्थितींत निःशून्य मनानें हवं तेवढं एकाद्या गोष्टी-भोंवतीं भिंगारत राहावं. कोणाचा कोणाला त्रास नाहीं. ती उघड्या डोळ्यांची समाधि ... मला तिची सारखी भूक लागलेली असते.

कोळी आपलं जाळें भराभर विणीत असतो आणि त्या जाळ्यावर बसल्या-बसल्या सारं जाळं हादरून जातं वाऱ्यानें. त्याबरोबर कोळीहि हेलकावे खात राहतो. तसं होतं माझं. आयुष्याचे तणावे मीं अधांतरीं बांधीत आलें. त्यावर अधांतरीं बसून कितीक हेलकावे खावे लागता-हेत मला. पण अशा शांत ठिकाणीं बसून मिळणाऱ्या मंद-मंद हेलकाव्यांनींच मला आनंद होतो. तेथं बसून माझी भूक भागते.

## ( ५ )

मला तुझ्यापासून दूर जाऊं दे. कधीं-कधीं मला वाटतं मीच तुला नसते पायबंद घालतें आहें—मीच तुझा नाश करतें आहें. तुझ्या स्वाभिमानी मनाला तुझ्या भविष्यकालाची मीं चवकशी करणं पटत नाहीं असं मला उघड-उघड दिसतं. तूं स्वस्थ बसतोस. पण तुझी निःशून्य दृष्टि मला खुणावते कीं—बघ, याच्या अंतरंगांत तुफानं उठलीं आहेत. कसलीं तीं तुफानं? कां तूं बोलत नाहींस? तुला हा माझा पाश फांसासारखा रुतत असावा असा मला संशय यायला लागतो. तुझ्या आयुष्याला वळण देण्याचा माझा अट्टाहास तुला टोंचतोसं मला वाटतं. तूं हट्टी आहेस. माझ्यासाठीं तूं कांहीं करणार नाहींस. तुला माझी फिकीर आहे कुठें? मग मी कां तुझ्यामागें वेड्यासारखी धांवतें? खरंच, तूं सुखासीन जीविताला लोभावलेला आहेस का? कीं माझी परीक्षा पाहतोस?

या संशयानेंच मला तुला सांगावंसं वाटतं—“तूं आणि मी एकत्र येणं शक्य नाहीं.” म्हणजे तरी चिडून तुझ्या साऱ्या शक्ती उफाळून कामाला लागतील. पण

लगेच भीति वाटते तू खरंच मला दूर जाऊं देशील! मग माझीं मतं नि माझ्या इच्छा तुझ्यावर लादून मला पाहिजे तसा तुला कोरून काढण्याचा हा माझा वृथा अट्टाहास तर नाहीं?

तुला असा भरीं भरण्याचीसुद्धां मला भीति वाटते. अशी टोंचून भरलेली चेतना कितपत टिकेल? पण तूं सुखांत नि चैनींत दिवस काढतांना दिसलास कीं मला वीट येईल तुझा.

सगळ्या स्त्रियांचं नाहीं मला माहीत, पण माझं मला माहीत आहे. मी आजपर्यंत धांव-धांव धांवतें आहें. आंतून कुणीतरी सारखं सांगत असतं—"पुढें चल, नको या चिखलांत रुतूं." आणि मला स्वतःला गंज-लेल्या आयुष्याचा वीट आहे. तूं नेहमीं म्हणतोस कीं "धांवतेस कशामागें?" तसंहि असेल. उगीच धांवणं असेल हें. साऱ्या मृगजलांतील नांवा असतील आमचीं ध्येयं म्हणजे. त्यांतून तरणार नाहीं आम्ही. पण रुतून बसण्यापेक्षां धांवणं बरं. जगल्यासारखं तरी वाटतं त्यामुळें.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र.

हे असमाधानाचे भाले मला टोंचताहेत. त्यासाठीं या तुला फोल वाटणाऱ्या ध्येयाच्या ढाली मी पुढें करीत असेन; त्या मला कुठपर्यंत पुरेशा पडतील हेंहि मला सांगतां येणार नाहीं. पण समाधानाच्या रुमरू आसनावर लुलं-पांगळं होऊन पडण्यापेक्षां ही सदान्कदांची रण-धुमाळी मला आवडते.

## ( ६ )

प्रत्येक स्त्रीलाच तिच्या विश्वामध्यें तिच्या पतीचें महत्त्व पाहण्याची आवड असेल. त्याशिवाय एक स्त्री दुसरीला आपल्या पतीच्या आवडी-निवडी अभिमानानें सांगून इतरांपेक्षां त्याचें वैशिष्ट्य सांगण्याचा अट्टाहास करणार नाहीं. मी जेव्हां-जेव्हां माझं मन चांचपून पाहतें तेव्हां-तेव्हां माझ्यांत ही आवड किती जिव्हाळ्याचें ठिकाण धरून बसली आहे हें माझ्या लक्ष्यांत आल्याशिवाय राहत नाहीं.

आपल्या मेळ्यामध्यें वैशाख उभा असतां त्याच्या दृष्टीखालीं सर्वांची दृष्टि दबतांना मला दिसते. त्याच्या बोलण्याकडे सर्वांचं लक्ष्य वेधलेलं मला दिसतं. त्याच्या बुद्धीनें तें वातावरण भारलेलं मला दिसतं, आणि वाटतं– अशाच माणसाच्या सान्निध्यांत माझं आकांक्षी मन सुखी होईल.

पण कित्येक वेळां मला संशय येतो कीं माझ्या मनाचेच हे सारे खेळ आहेत. मीच हे माझ्या मनचे रंग माझ्या आवडीप्रमाणं भरतें आहें. पण असं कसं होईल ? आज कितीक वर्षं ज्या-त्या गोष्टींत आदरानें त्याचं नांव

उच्चारलेलं मीं ऐकलं आहे. नाहीं, माझा भ्रम नाहीं हा. तरी वाटतं कधीं-कधीं कीं वैशाखाच्या तीक्ष्ण वृत्ती आहेत. इतका तीक्ष्णपणासुद्धां मला खुपत राहील. पण मग मला पाहिजे आहे काय ?

## ( ७ )

जहाज हांकारलं आहे दर्यांत, वाऱ्यानें शिडं फुगलीं आहेत. आतां असा आत्मविश्वास वाटतो कीं हें वारं असंच वाहत राहिलं तर हा आयुष्याचा दीर्घ प्रवास हां-हां म्हणतां संपल्यासारखा वाटेल. पण जर कां वारा पडला तर वाताहात होऊन हें जहाज लाटांबरोबर अस्थिर नाच करीत दर्याभर भटकत राहील कुठंतरी. कोण-तीच तड नाहीं. मला याचीच भीति वाटते तरी त्यांत शिरण्याचा मोह अनावर होतो.

जाऊं दे मला अशीच. कां भीति बाळगायची ? नाहीं तरी सगळा प्रवास सुखाचा झाला तर त्यांतहि रंग भर-णार नाहीं. त्याची आठवणसुद्धां लवकर बुजेल. प्राण-संकट येऊनहि धडपडून त्यांतून बचावत गेलों तर तीं सारीं दुःखं आणि त्यांतून उगवलेलीं सुखं यांच्या आठव-णींनीं सगळ्या प्रवासाला सतत नवलाई राहील. म्हणून कित्येक वेळां वाटतं आम्हां दोघांत कित्येक बाबतींतील थोडी भिन्नता आहे तीच बरी. त्या भिन्नतेनेंच आम्ही एकमेकांना जिंकीत राहूं. त्या लढ्यानेंच आयुष्य भरल्या-सारखं वाटेल. सारखवटपणानें आयुष्य उबून जाण्यापेक्षां अशा कष्टांतून मिळणारं आयुष्य केव्हांहि सकस असेल !

(८)

डोळे मिटले तरी आणि आढ्याकडे डोळे लावले तरी तींच प्रेमळ पण मित्र्या आसऱ्याचीं दृश्यें डोळ्यांपुढें वावरतात. तेच तुझे कोमल शब्द कानांत घुमूं लागतात. संध्याकाळच्या वेळीं पक्षी घरट्याशीं आल्यावर जो चिव-चिवाट लहान-लहान पिलें करतात तसलाच चिवचिवाट माझ्या अंतःकरणांतील भावना त्या आठवणी जवळ येतांच करूं लागतात. आणि तीं पिलें जशीं आईच्या पंखांत इवलाल्या चोंची खुपसून रात्रभर स्वस्थ पडतात, तशा माझ्या भावना त्या आठवणींत भिंगारत राहतात. तुला खरं सांगूं? मला या स्थितीचं वाईट वाटतं मोठं. कुणी या जाणत्या वयाला आयुष्याचा वसंत म्हणत असतील; पण मी तरी तसं म्हणायला तयार नाहीं. शुद्ध स्वच्छ आयुष्याची गंगा या जाणत्या वयांत कसल्यातरी भावनेनें सारखी डहुळली जाते. किती गढूळ पण! दर दिवशीं तिच्यांत फरक. एखादे दिवशीं निश्चयानें ठरवावं कीं–"अंः हा सारा तारुण्याचा मूर्खपणा आहे. आतां असले विचार मनांतसुद्धां येऊं द्यावयाचे नाहींत." आणि पाण्यानें भिजलेले पंख फडफडवून पक्षी जसा अंग कोरडं करतो तसं मी माझें मन कोरडं करतें तेव्हां; आणि किती समा-

धान वाटतं त्या दिवशीं विजयाचं. पण लगेच त्याला दृष्ट लागते, नि जें तुफान उसळतं तें कितीक दिवस! हें जाणतं वय म्हणजे आयुष्याचा पावसाळाच. त्यांत किती भयंकर तुफानं उठतात आणि किती कमालीची स्तब्धता असते. पण तीं सारीं तुफानं उठवणारींच; कारण समाधानानें प्रेमळ दृश्यं आठवीत गुंगून पडावं, तोंच व्यवहारी जगांतून झंझावात येतात आणि गंधर्वनगरींतील दृश्यं कुठल्या कुठें पळवून नेतात.

## वैशाख—

( १ )

अशीच धडपड आणि तळमळ माझ्या अंतःकरणांत राहूं दे. ती धडपड आणि तळमळ ज्या दिवशीं शांत होईल त्या दिवशीं जीवन्मरण मला आलं असं मी समजेन. मी माझ्या भोंवतालच्या अनेक व्यक्तींकडे पाहतों. मला सारे विझलेले निखारे वाटतात. मला वाटतं ऐन तिशी-पस्तीशींत सगळीं माणसं मरतात. मला हीं सारीं माणसं मेलेलीं दिसतात. संसारांत स्थिरस्थावर होऊन " मार्गाला लागलों ", " आयुष्याला दिशा लागली " असं समजणारीं माणसं जेव्हां माझ्या-सारख्या माणसांकडे " फटिंग " म्हणून पाहतात तेव्हां क्षणभर मी गडबडतों. तरी मला वाटतं मीच खरा जगतों आहें आणि हीं अर्धमेलीं झालीं आहेत. पुनः-पुनः त्याच-त्याच गोष्टींत डुंबून नीरस झालेलं त्यांचं जीवन, यंत्रासारखं त्यांचं जीवन, मला मोह पाडीत नाहीं. किती कृत्रिमपणें जगतात हीं सारीं माणसं ! तीशी-पस्तीशीपर्यंत खऱ्या जगलेल्या आयुष्याचं पुढील आयुष्य हें निव्वळ प्रतिबिंब. त्या जिवंत आयुष्यांत केलं-बोललेलं पुनःपुनः आळवीत राह्यचं हेंच ना तें जगणं !

## (२)

रोहिणी ! सारं रिकामं वाटणारं हें आयुष्य भरून काढशील का तूं माझं ? तूं जेव्हां कधीं–कधीं तळमळीनें बोलायला लागतेस तेव्हां मला वाटतं ज्या असमाधानानें माझं आयुष्य खळबळून गेलें आहे त्याच तसल्याच तऱ्हेच्या असमाधानानें तुझीहि धडपड चालली आहे. असमाधानाच्या त्वेषांत आजूबाजूला मोडकळीस आलेलं सारं मोडून नवं निर्माण करावं असा ध्यास लागतो, तेव्हां आंत उठणारे कढ तुझ्या जवळ बोलूनच हलके होतील असं वाटतं.

तूं म्हणतेस चिमणी-कावळ्याचा संसार नको आहे. तशाच मलाहि कचकड्याच्या बाहुल्या नको आहेत. मला गुलाम नको आहे, तर विचार करणारं माणूस हवं आहे. रोहिणी ! मला किती वेळां पुष्कळशा मुलींकडे पाहिलं कीं असं वाटायला लागतं कीं त्या आपल्या नाजुक नखऱ्यांनीं पुरुषांचा बळी घ्यायला हिंडणाऱ्या पऱ्या आहेत. मला त्या नाजुकपणानें कधींहि मोह उत्पन्न होत नाहीं. संसारांत स्थिर होऊन निश्चेतन होऊन बसलेले शेंकडों तरुण जेव्हां मी पाहतों तेव्हां आपल्या नाजुक मोहकतेची भिंगारणारी

गुंगी देऊन त्या तरुणांच्या मनुष्यत्वाला नख लावणाऱ्या या मायाविनींचा मला संताप येतो! पुरुषांना गुंगी आणणं हेंच त्यांचं काम!

रोहिणी! तुझ्यांतील तडफड पाहिली कीं वाटतं तूं मला अशी गुंगूं देणार नाहींस. माझ्यांतील माणुसकी जगवण्यासाठीं व तुझी माणुसकी टिकवण्यासाठीं तुझा सतत अट्टाहास चालेल! आणि मला असाच लढा हवा आहे!

## (३)

तुला वाईट वाटतं म्हणतेस ? कां बरं डिंवचून जागं केलॅस मला ? जागृति आल्यावर, गुंगी उतरल्यावर तूं स्वस्थ बसायला सांगणार मला ? नाहींतर दुखणाईता-सारखी मंद-मंद गतीनें एवढीशी मजल मारून थांबायला सांगणार ? माझीं निराशेचीं स्वप्नें विरलीं आहेत. तूं चल माझ्याबरोबर. तूं आणि मी दोघं आपली ध्येयमूर्ति रात्रं-दिवस खोदीत बसूं. ऊन, पाऊस, थंडी कशाची तरी क्षिति वाटेल का आपल्याला ? आणि दोघांच्या एकाच चिंतनानें आपण किती दूर गेलों शरीरानें तरी मनानें एकत्रच असूं नाहीं का ? मी कितीतरी सुखस्वप्नं – होय, सुखस्वप्नंच तीं – पाहतों. अगदीं आपणां दोघांचा मृत्यु सुद्धां सुखस्वप्नच आहे माझं.

(४)

माझी ही चीड विनाकारण आहे का ? या ऐस-पैस चौसोपी घरांत हिंडतांना मला कधीं आनंद होत नाहीं. मला कळत नाहीं यांत सुख आणि समाधान कुठं आहे तें. मी सकाळीं उठतों. माझ्या तोंड धुण्याच्या ब्रशापासून माझी तरतूद आणि शागिर्दी करायला ठेवलेला हा नोकर, माझ्या आळसावलेल्या श्रीमंतीचा डामडौल ठेवण्यासाठीं स्वतःचं अधःपतन करीत असलेला हा प्राणी ! यानें माझं काय हित केलं अगर आम्हीं याचं काय हित करतों ! आमच्या घरांतील माणसांपेक्षां दीडपटीनें वाढलेली ही नोकरां-चाकरांची संख्या पाहिली कीं सोनेरी टोळीला अजाणतां मदत करणाऱ्या खेडवळांची आठवण होते मला. असंच का चालायचं आहे हें ? कांहींनीं पोटाला चिमटा घेऊन दुसऱ्यांच्या सुखसोयींसाठीं रात्रंदिवस राबायचं आणि कांहींनीं त्यांच्याच माना मुरगाळून त्यांना आपल्या सुखासाठीं राबवीत ठेवायचं.

आणि सुखाचं अजीर्ण झालेले आम्ही लोक ! त्यांनीं उद्योग काय करायचे ? तर कुठल्यातरी क्लबाचं मेंबर

व्हायचं, सभा भरवायच्या, मोठमोठीं भाषणं करण्याचा आव आणायचा, लोककल्याण करीत असल्याबद्दल स्वतःची आणि दुसऱ्यांची फसवणूक करीत असायचं.

अण्णांचे सबंध दिवसाचे अविरत चाललेले उद्योग पाहिले म्हणजे मला कधीं-कधीं वाटायला लागतं. या साऱ्या उद्योगाचा न कळतां शेवट म्हणा किंवा फायदा म्हणा एकच साधायचा असतो. स्वतःचं महत्त्व. त्या विशिष्ट महत्त्वासाठीं नसली आवड तरी सभांना जायचं, नको असलं तरी क्लबचं मेंबर व्हायचं. नाना तऱ्हेचे पोशाख, पार्ट्या, कितीतरी. एकसुद्धां गोष्ट अंतःकरणाला आल्हाद देते म्हणून करीत असतील का हे ? सगळं आपलं महत्त्व संभाळण्यासाठीं. कांहीं करायला नाहीं. म्हणून हे उद्योग करीत बसायचे. खरा निढळाचा घाम काढण्याचा प्रसंग आला तर मग कनिष्ठ वर्गांत आणि यांच्यांत काय फरक राहणार ? यासाठीं कांहीं न करतां करीत असल्याचा आभास उत्पन्न करण्यांतच सगळी शक्ति खर्च करीत असतात.

मी जेव्हां-जेव्हां असल्या उद्योगांकडे पाहतों तेव्हां मला वाटतं कीं दारिद्र्य हा जसा एक समाजाचा रोग

आहे, तसा श्रीमंती हाहि एक रोग आहे. स्वतःच्या सुखासाठीं निरुपयोगी व हजारों भुकेकंगालांचे कष्ट घेण्याची संवय ही आत्मिक बल कमी करणारी नाहीं का ? त्यांत खरे श्रम नाहींत आणि खरा संयम नाहीं. असलाच एक रोगी मी व्हावं अशी आई-अण्णांची इच्छा असेल, तर मला नको आहे तें.

(५)

घराची कल्पना येते तेव्हां ती फार भयंकर स्वरूपांत येते माझ्यापुढें. कितीहि स्वतः मानलं नाहीं तरी विचित्र परीस्थितीचं बंधन—समाजाचं बंधन—असतंच. म्हणून भित्र्या हळव्या मनानें कर्तबगार स्त्रीनें स्वयंपाक, मुलं आणि धर्मकर्म यांतच पिचत राह्यचं! कुणा एकाला तरी हा जीवनक्रम मनांतून आदरणीय असा वाटतो का? कांहीं वाटत असला तर तो आदर नसतो, स्वतःच्या सुखाची लालसा असते. अशा दिनक्रमांत स्त्री मनाचीं कवाडें बंद करून घेते. स्वतःचं मनुष्यत्व, व्यक्तिमत्त्व खुरटवून घेऊन घराबाहेरच्या प्रकाशानें डोळे दिपूं लागल्यानेंच केवळ कायमची अंधाऱ्या घरीं ती बसून राहते. बाहेरच्या वाढत्या प्रकाशांत राहणारा पुरुष घरांत आल्यावर त्याला डोळे जात चाललेल्या अशा स्त्रीकडे पाहून मोठं सुख होतं असं थोडंच आहे. पण त्यालाहि दुसरा मार्ग नाहीं म्हणून तो मन मारून भावनांचा उपशम करीत राहतो. जाणत्या स्त्री-पुरुषांचीं हीं दुःखें. ज्यांना कळतच नाहीं अगर कळवून घेण्याची इच्छा नाहीं त्या स्त्रिया आणि पुरुषहि माणुसकी नष्ट होऊन जगत असतात.

स्त्रीचं अज्ञान पाहून पुरुषाचं मन थरारत नाहीं. पुरुषानें स्वतःच्या निव्वळ शरीरसुखासाठीं स्त्रीचा घास घेतला तरी अजगर शेळी गिळीत असतां ती जशी स्तिमित होऊन मुकेपणानें गिळली जाते तसं होतं स्त्रियांचं. त्यांचा अहर्निश एक उद्योग कळायला लागल्यापासून तों पिचून पडेपर्यंत. त्या कितीहि शिकोत, नवी जीवनपद्धति स्वीकारोत ! त्यांचं सारं जीवन आणि कला यांचंसुद्धां ध्येय एकच. पुरुषाची खुशामत ! प्रथम त्यांना जिंकण्यासाठीं, नंतर स्वतः जगण्यासाठीं ! आणि पुरुषांची सारी धडपड प्रथम स्वतः स्त्रीच्या आहारीं जाण्याची ! नंतर तिला लाथाडून घराबाहेर पाडण्याची ! अशींच आमचीं घरं आणि असेच आमचे संसार आहेत.

कळायला लागल्यापासून प्रत्येक तरुणाचा आणि तरुणीचा अट्टाहास चाललेला असतो असलीं घरं करण्यासाठीं. आजूबाजूचे सारे लोकहि कल्लोळ उठवून घर करायला प्रवृत्त करीत असतात. पण ज्या स्वतःच्या जखमा झांकून ते बोलत असतात त्या जखमा जर साऱ्या त्यांना उघड्या करून दाखवायला लावलं तर...तर मला वाटतं त्यांचा सूर म्हणजे निव्वळ निराशेच्या सूडाचा आहे असं दिसेल. ज्या सुखाच्या आशेनें ते घरट्यांत

जातात त्या सुखाचा केव्हांच उन्हाळा झालेला आढळतो. पुन्हां त्यांची तगमग सुरूच राहते. कित्येक तसेच तगमगत जळत राहतात जागच्या जागीं. आणि कित्येक त्या तगमगीनें उबून घराचे बंध तोडतात.

(६)

कां कोण जाणे पण माझं स्वप्न विरणार असं मला वाटूं लागतं कधीं-कधीं. तुझ्याशीं बोलून पुरेसं वाटत नाहीं. तुझ्याशीं बोलतांना तुझ्या नेत्रांतहि भारावून दिसणारी माझ्याबद्दलची आत्मीयता मला गुंगवून टाकते. पण क्षणभरच. लगेच वाटतं खूप-खूप धांवत जावं आणि ज्या-ज्या माणसांत माणुसकी उरली असेल त्याला-त्याला आंतून उफाळून गर्जणाऱ्या विचारांचे कल्लोळ ऐकवावे. रोहिणी ! तुला सांगूं कित्येक वेळां मी बोलत असतों तुझ्याशीं. पण तुला मी पुरा विसरून जातों आणि माझेच सारे भाई अगदीं माझ्या आंवतीं-भोंवतीं बसले आहेत आणि त्यांना मी माझं हृद्गत सांगतों आहें असं वाटतं. पण तेंहि क्षणभरच. तुझ्या डोळ्यांत मला तुझ्या स्वतः-च्या विश्वांत कोंडण्याची असीम आतुरता दिसते. ती मला खडबडून जागा करते. आणि पळायला लावते दूर.

## ( ७ )

मी शांत मनानें विचार करतों तेव्हां माझी खात्री होते कीं खरोखर तुझ्या–माझ्यांत मोठी-थोरली दरी पसरलेली आहे. माझा इलाज नाहीं. माझ्या दृष्टीनें अंतिम सुख म्हणून ज्याला मानलं त्यापासून मलाहि दूर जातां येत नाहीं. तुला मला फसवतांहि येत नाहीं. तुला सोडतांना किंवा तूं दूर जातेस असं म्हणतेस तेव्हां मलाहि कमी वेदना होत नाहींत. पण त्या वेदनांपुढें मला दिसणाऱ्या सत्याचा त्याग जर मीं केला तर मला अधिक वेदना होतील. ही ज्योत माझ्या अंतःकरणांत पेटली आहे. आतां ती विझवणं तुझ्या अगर माझ्या कुणाच्याच हातीं नाहीं.

तूं ज्याला दिव्य म्हणतेस, भीषण-भयंकर म्हणतेस तें मलाहि तसंच वाटतं. पण म्हणूनच मला त्याच्याशीं खेळून पाह्यचा अनावर मोह आहे. तो मोह मला आतां सोडवत नाहीं. तुझ्या प्रेमळ दृष्टीची आणि स्पर्शाची भूक अनावर खरी, पण माझ्या ध्येयाची दृष्टि मला अधिक आकर्षक वाटते. सगळ्यांच्या संशयी दृष्टीचें केंद्र जेव्हां मी होऊन बसतों तेव्हां माझ्या विश्वासाचं स्थान

म्हणून तुझ्याकडे येण्यासाठीं पावलं वळतात, पण मला माहीत आहे तूं कुरवाळून मला जवळ घेशील तेव्हां माझा बुद्धिभ्रंश होईल. आणि तात्पुरता तुझा मोह मला झाला तरी नंतर मला तुझं हंसूं येईल, कींव येईल, तिरस्कारहि येईल कदाचित्.

तुझ्या-माझ्यांत पुष्कळ अंतर पडलं असलं तरी तुझ्यांतील स्त्रियांत क्वचित् सांपडणाऱ्या व्यक्तित्वाला औदासीन्यानें धक्का कशाला देऊं ?

(८)

आजचं तें पाखरूं. पुनःपुन्हां माझ्या नजरेसमोर येऊन शहारे येताहेत माझ्या अंगावर. खिडकीच्या गजांतून मी पाहत होतों. एका पोरानें त्या पांखराच्या पायाला सैलशी बारीक पण लांब दोरी बांधली आणि एका खिडकीच्या गजाला बांधून ठेवलं त्याला. त्या पाखराला पोरगा बांधीत असतांनाच मला शहारे आले. कौतुकानें पोरगा त्या पाखराकडे पाहत होता. पोराच्या हातचा घांस घेतलेलं तें पाखरूं —उडायचं स्वातंत्र्य आहे या आभासानें भुललेलं तें पाखरूं—पंखांत जोर भरून उडूं लागे आणि जरा उंच जात आहे तोंच पायाला त्या पाशाचा कांच बसे आणि बिचारं तिथल्या तिथं असहाय होऊन तोल जाऊन पुन्हा माघारं फिरे. पुन्हां आभास, पुन्हां तीच पाय कांच-वणारी झेंप. सारखं असंच चाललं होतं. त्या पोराच्या तोंडावर कौतुकाचं हंसूं होतं, पण मला त्यानें चीड आली. हें आपलं पाखरूं आहे. उडालं तरी किती ? इथल्या इथें. या खात्रीनें निर्धास्तपणें पोरगा घरांत गेला. पण मला एकदम विचार मनांत येऊन धक्का बसला. ज्या

# विरलेलें स्वप्न

खिडकींतून मी पाहत होतों तिचे गजच मला क्षणभर पिंजऱ्यासारखे वाटले.

असेच–असेच आहेत तुम्हां बायकांच्या प्रेमाचे पाश संसारांत गुंतवून टाकणारे असं मला वाटलं. खूप गोंधळून मी त्या पाखराच्या दूर उडून जाण्याच्या अट्टाहासाकडे पाहत होतों. त्याचा पाय कांचून तुटेलसं मला वाटलं. शेवटीं तो दोरा मध्येंच तुटला आणि त्या तुटलेल्या दोऱ्याचा अवशेष—त्याच्या खिळवणुकीचा इतिहास—बरोबर घेऊन कां होईना तें पाखरूं उंच उडालेलं मीं पाहिलं तेव्हां आनंदानें मी खूप हंसलों मनाशीं! पुन्हां तो तुटका दोरा त्याला गुंतवील—अधिक गुंतवील. तोकडा झालेला तो दोरा कदाचित् आतां मध्यें आणखी तुटून त्या पांखराला मोकळा करणार नाहीं, त्याचा कांचलेला पाय तुटून कां होईना तें पाखरूं पुन्हां मुक्त होण्यासाठीं धडपडेल. एवढं माझ्या प्रत्ययाला आलं त्याचा अट्टाहास पाहून. पायाच्या वेदनेबरोबर पंखांचं सामर्थ्य उपयोगांत आणण्याचा आनंद तरी मिळेल त्याला.

(९)

माझ्या मनांत उसळणारे विचार कोणा ना कोणापाशीं सारखं बोलत राहावं असं मला वाटतं. त्याच उत्साहानें मी तुझ्याकडे येतों. पण बोलावंसं वाटत नाहीं. तुझ्याशीं बोलून समाधान होईलसं वाटत नाहीं. आणि तें असमाधानच इतकं तीव्र होतं कीं तुझा मोह कोठल्या कोठें दडपला जातो. मी बोलत असतांना तूं ऐकतेस, पण तुझा उत्साह मला मावळलेला दिसतो. तूं स्वतःच्या विश्वांत इतकी रंगून गेलेली दिसतेस कीं मला तुझी कींव येते. मी जितका-जितका ह्या वाह्य जगाशीं समरस होतों आहें तितकी-तितकी तूं केवळ अंतर्मुख होत चालली आहेस. मला पुष्कळ वेळां कळत नाहीं कीं आपण कां जवळ यायचं ? मनांतले विचारांचे कढ माझ्या भाईंजवळ बोलून किती शांत होतात ! मी विचार करतों तेव्हां माझी ओढ रात्रंदिवस तुझ्यापेक्षां त्यांच्याकडेच लागलेली मला दिसते !

( १० )

त्या मोठ-मोठ्या सभा. त्यांतील ती रोमांच उठवणारी खळबळ. त्यांनीं कित्येकदां मनाचे धागे अतिशय ताणले जातात. कित्येक वेळां सभा जिंकल्याचा मनमुराद आनंद होतो. आणि रात्रीं-अपरात्रीं मी घरीं येतों तेव्हां त्या खोलीचें दार उघडतांच कोणींतरी प्रेमळपणें हांक मारावी असं कितीतरी वाटतं. आपल्या दुथडी भरून वाहणाऱ्या आनंदांत कोणाला तरी भागीदार म्हणून घ्यावंसं वाटतं. मनाचे धागे तटातट तुटूं लागले कीं कोणाच्या तरी स्नेहासाठीं तळमळ लागून राहते. अशा वेळीं धांवत तुझ्याकडे यावंसं वाटतं. पण लगेच विचार येतो मनांत कीं तुला सांगून काय फायदा ? माझ्या आनंदाचा विरस करूं नये म्हणून तूं वरवर हंसून बोललीस किंवा कौतुक केलंस तरी माझं समाधान व्हायचं नाहीं. पण मला कबूल केलं पाहिजे, स्त्रीच्या प्रेमळपणाची आणि सान्निध्याची तहान अनावर होते. ती मारतांना महत्प्रयास पडतात. रिकामा असेन त्यावेळीं एखादे वेळीं नव्हे, बरेच वेळां मन इतकं लोभावतं कीं श्रेष्ठता वाटणारीं जिवाभावाचीं ध्येयें त्यानें उलथून

पडणार कीं काय! आतां अशी सगळी मनोभूमि हादरून जाते. तुझें सान्निध्य नाहीं तर जगांत दुसरें कांहीं नाहींच असेंहि वाटूं लागतें. तेंच जीवनसर्वस्व असें त्या क्षणाला वाटतें. त्या विकारावेशांतून मन काढणं व चोहों बाजूंनीं पेटलेल्या घरांतून मुळींच धग न लागतां बाहेर पडणं सारखंच.

केवळ त्याच क्षणाला आयुष्याची अपूर्णता मनाला इतकी तीव्रपणें जाळूं लागते कीं यांतून मी बाहेर कसा पडणार या विवंचनेनं मी हताश होतों.

काय ही प्रचंड वावटळ! मस्तक फुटणार तर नाहीं ना या विचारांनीं? इतकं मन लोभावून जातं कीं हें सगळं सोडून द्यावं रोहिणीच्या प्रेमळ सहवासासाठीं. एकदां तर वाटतं आतांचा क्षण तरी जावें.

## ( ११ )

“ असमाधानी वृत्तीला नेहमीं हलवून सोडणारं, नवचेतना देणारं असं कांहींतरी मला लागतं ” असं तूं म्हणालीस. रोहिणी ! तुला या आपल्या जीवनांत नाहीं का सतत रोमांच उभवणारींच दृश्यं दिसलीं ? हा मार्ग अडचणींचा तर खराच. पण त्यांत विलक्षण आकर्षण आहे. तें सतत त्या मार्गालाच खिळवून ठेवील. सारे कांटेकुटे, वणवेसुद्धां मोहकच वाटतील त्या आकर्षणानें. तारुण्याच्या वेड्या मस्त शक्तींना टकरा खेळायला या मार्गावरील श्रद्धा पुरेशी आहे. या जगाच्या मंद-मंद गतीकडे पाहून माझी जेव्हां निराशा होई तेव्हां असं वाटे कीं जें बुद्धीला पटत नाहीं त्या सर्वांचा विध्वंस करीत जावं. आणि मेलेलं जगण्यापेक्षां सगळं मारून तरी नवा जीव जन्माला येतो कीं काय पाहावं ! रोहिणी ! अंतःकरणाची बेसुमार भूक तडफड करायला लावते तेव्हां त्या बेसुमार भुकेला पुरेसं भक्ष्य या श्रद्धेनेंच मिळणार आहे असं नाहीं का तुला वाटत ? सत्य, ध्यास, सामर्थ्य यांसाठीं लढण्याचा आणि विजयाचा आत्मविश्वास याशिवाय जीविताचं सौंदर्य तरी दुसऱ्या कशांत आहे ?

## रोहिणी—

( १ )

तुझ्या स्त्रीस्वातंत्र्याच्या कल्पना मला भुलवतात यांत शंका नाहीं. ज्यासाठीं माझं मन संसारांत पडायला कचरतं तीं कारणेंच इथं नाहींशीं झालेलीं मला दिसतात. पण मी सावध राहणार आहें. मला कित्येक वेळां असं वाटतं कीं जिंकायला निघालेला पुरुष साम-दामाचे अचूक उपाय योजीत असतो. स्त्रीचीं मतं मर्जी पाहून तिच्या कलानें आपलीं मतं, आवडी-निवडी तो भासवतो. त्याला फसून जर एखादी स्त्री शरण जाईल तर तिला कधीं-कधीं पश्चात्तापाची वेळ येईल. म्हणून मी बोलणार नाहीं आणि उघडणार नाहीं माझं मन. माझ्या एकाद्या शब्दा-नेंहि माझ्या कल्पनांचा सुगावा लागूं न देणं हेंच अंतीं हिताचं आहे. तूं बोल. तूं आपण होऊन मांडलेल्या तुझ्या कल्पना माझ्याशीं विसंगत आहेत असं मला वाटलं तर मला माझा तोल सांवरणं सोपं जाईल.

प्रेमाचे खेळ आंधळेपणानें खेळणं म्हणजे आयुष्याशीं आंधळेपणानें खेळणंच आहे. मला माहीत आहे. ही भावनाच अशी आहे कीं ती मुत्सद्यांच्या डोळ्यांवरहि झांपड आणते. चोरट्या पावलानें दोन व्यक्तींच्या मनाचा ताबा घेऊं पाहणारी ही माया अंगांत येऊन दोन व्यक्तींना

जगाशीं चोरखेळ खेळायला लावते. तो खेळ खेळत असतांना येणाऱ्या धुंदींत त्या दोघांना आपल्या एकवटलेल्या सामर्थ्यापुढें जगाचं सामर्थ्य कःपदार्थ वाटायला लागतं. कठोर व्यवहाराच्या मंत्रानें बुजलेली ही माया आल्या चोरवाटेनेंच परत जाते. मग मात्र जागीं झालेलीं विचारीं दोघं निराधारपणें जगाचा आसरा शोधायला जातात !

## ( २ )

" पुरुष मिळवून आणतो आणि बायका-पोरांना खायला घालतो याचं स्वरूप माझ्या दृष्टीला निराळं दिसतं. स्त्रीला त्यांत गुलामगिरी वाटण्याचं कारणच नाहीं. ती स्वतंत्र आहे. ती त्याचा संसार करीत असते, त्याची मजुरी तो तिला देतो. तिच्या श्रमांच्या मानानें त्याची मजुरी नसते बरेच वेळां. हें संसारांतील श्रमविभागाचं तत्त्व प्रत्येक स्त्रीपुरुष लक्ष्यांत ठेवील तर कुणीं कुणाकडे कमी-अधिकपणाच्या भावनेनें बघण्याचं कारण नाहीं. दोघेंहि स्वतंत्र स्वतःच्या कष्टानें जगताहेत हीच भावना दोघांच्या ठिकाणीं राहिली पाहिजे. ही जाणीव आमच्या स्त्रियांत येईल तेव्हांच त्यांच्यांत स्वतंत्रपणें विचार करण्याची शक्ति येईल." अशासारखंच कांहींसं तूं नेहमीं म्हणत असतोस. तुझ्या या कटु सत्यानें मला धक्का बसला खरा. त्यामुळं संसाराचं काव्यमय स्वरूपहि माझ्या दृष्टीपुढून नाहींसें झालें. त्याबरोबरच स्वतः दुसऱ्याची गुलामगिरी पत्करून पैसा मिळवायचा व त्या बळावर स्वतःच्या आर्थिक स्वातंत्र्याबद्दलची समजूत घालायची हा अट्टाहासहि कमी झाला.

संसारांतील उभयतांच्याकडे पाहणाऱ्या तुझ्या असल्या दृष्टिकोणानें माझ्यासारखीचं समाधान झालं तरी कित्येक वेळां मला असं वाटतं कीं श्रमाचं प्रत्येक वेळां मूल्य देण्या-घेण्याची ही वृत्ति किंवा श्रमाकडे अशा तऱ्हेनें पाह-ण्याची दृष्टि या दोन्ही मनुष्यांच्या अत्यंत गोडव्या भावनांत जहर भरतात. त्याग, निरपेक्ष सेवा यांच्या मूळाशीं अशा कांहीं नाजुक भावना आहेत कीं त्याचं मोल कुणीं केलं तर तें करतां येणार नाहीं. त्यांचं मोल करतां येत नाहीं पण अंतः-करणांत तीव्रपणानें तें जाणवतं, म्हणूनच हृदय आर्द्र राहतं. मनुष्याच्या रूक्ष जीवनाला अशा अमोल भावनांनींच स्निग्धता आली आहे. त्या भावनांना जोखून त्यांची किंमत हरघडीं करूं लागणारी व्यापारी वृत्ति जेव्हां मनुष्याच्या मनांत संचरेल तेव्हां त्याला जीवन असह्य झाल्याशिवाय राहणार नाहीं.

छेः ! संसार हा धंदा म्हणून पत्करायचा ! कल्पना ओंगळ वाटते ही ! अगदीं त्याचं स्वरूप तसंच असलं तरीहि असं म्हणायला बरं वाटत नाहीं. त्यापेक्षां त्याग, निरपेक्ष सेवा आचरण्याचं तें एक क्षेत्र हेंच स्वरूप मला

अधिक समाधानाचं वाटतं. अंधश्रद्धेची गुंगी परवडली, पण भ्रमनिरास नको.

तूं म्हणतोस त्याप्रमाणें संसारांत श्रमजीवनाचें तत्त्व जागरूकपणानें पाळलं तर असंहि होईल कीं एखाद्याची मजुरी आवडत नसली कीं दुसरा मजूर लावावा. स्त्रीचे श्रम पुरुषाला तितक्या किंमतीचे वाटले नाहींत कीं त्यानें तिला झाल्या दिवसांचा पगार हातावर देऊन जा म्हणून सांगावं. तसंच स्त्रीनेंहि. तुझ्या या नीतीच्या, समाजाच्या कल्पना बुद्धीला आकर्षक वाटल्या तरी भावनांना आकर्षक वाटत नाहींत. आणि तूं म्हणतोस यांतच भावनांची जोपासना आहे म्हणून ! मला गोंधळल्यासारखं होतं विचार करायला लागलं कीं.

## ( ३ )

मला एखादे वेळीं फार भीति वाटायला लागते तुझी. मला काय पाहिजे तें तुझ्यांत मिळणार नाहीं असंही मला वाटायला लागतं. आणि पायाखालची जमीन हादरल्या-सारखी वाटते. कसली ही माया ? मला तर वाटतं शरीराची आणि मनाची भूक बुडवून टाकणारी ही तात्पु-रती गुंगी आहे. ती उतरली तर मनाची भूक तीव्रतम झालेलीच मला आढळेल. म्हणून अशा भारलेल्या स्थितींत-सुद्धां मनावर पडलेलं दडपण जोरानें दूर फेंकण्याचा मी प्रयत्न करतें. आणि तुझं खरं अंतःस्वरूप माझ्या दृष्टी-पुढें येतं तेव्हां माझा थरकांप होतो. हें असं नको आहे एवढं मला कळतं, पण कसं असायला पाहिजे तें सांगतां येत नाहीं.

अनेक जोडपीं मी सभोंवतीं पाहतें, तेव्हां कोणा-सारखं जीवित मला चालेल अथवा आवडेल याचा मी नकळत शोध करीत असतें. आपणां दोघांच्या संसाराचं चित्र मी डोळ्यांपुढं आणतें. पण आपल्या भूमिका रंगणार कशा हेंच मला कळत नाहींसं होतं आणि मी गोंधळांत पडतें. खेळ खेळणारापेक्षां बघणाराला चुका

अधिक कळतात म्हणतात ना ? आपला हा खेळ आपुलकीच्या भावनेनें जे कोणी पाहत असतील त्यांच्याकडे अशाच गोंधळलेल्या मनानें धांवत जावं नि विचारावंसं वाटतं कीं सांगा कोण चुकतं आहे तें. पण मनाचे मुके खेळ खेळणाराला तर कळत नाहींतच आणि पाहणाराला तरी काय कळणार ? अशा मनाच्या आंदोलनांत तूं माझ्यापासून फार दूर आहेस असं मला वाटतं. किती त्रयस्थपणाची भावना डोकावते एखादे वेळीं ! आणि वाटतं बरा आहे हा एकटा जीव. दुसऱ्याच्या विश्वासावर पोहायला पडण्याचा अट्टाहास करायचा ? त्याच्या क्रीडा नि करामतीला टिकण्याइतका दम नसला तर दोघांचा जीव घ्यायचा आपण ?

( ४ )

कसं सांगूं तुला ? पण कधीं-कधीं हे सारे पाश मला इतके क्षणभंगुर वाटतात. कोळ्याच्या जाळ्याच्या धाग्या-इतके नाजुक असणारे हे पाश, पण मला त्यांनीं माझं अंग करकचून गेल्यासारखं, रक्तबंबाळ झाल्यासारखं वाटतं. उन्हाच्या तिरपीनें मोत्यांप्रमाणें पसरलेलें दंव क्षणार्धांत शोषून निघतं. ही मायासुद्धां विचारां-विचारांनीं अशीच शोषून जाते. मला हंसूं येतं तेव्हां, आणि मीच स्वतःशीं म्हणतें –"हेंच का प्रेम ? रेशमाच्या किड्याप्रमाणें स्वतः-भोंवतीं मायापाशांचें घर बांधून स्वतःला डांबून घेणारं नि एक दिवस आंतल्या आंत गुदमरवून टाकणारं तें का हें प्रेम ?" वैशाख ! मी स्वतःलाच फाडून बघतं आणि मला वाटतं 'प्रेम' 'प्रेम' म्हणतात ती निव्वळ झांपड आहे.

थंडीच्या दिवसांत डोक्यावरून पांघरूण घेऊन अजून उजाडलं नाहीं या कल्पनेनं उबेंत निजावं. त्यांतहि कशी-बशी चेतना उत्पन्न होऊन किलबिल्या नजरेनें बाहेर पाहावं तों जिकडे-तिकडे लखलखाट ! अशा वेळीं जसं धस् होतं पोटांत तसंच प्रेमाच्या अंधाऱ्या उबेंतून विचार

जेव्हां लख्ख प्रकाश दाखवतो तेव्हां भ्याल्यासारखं होतं मला.

खवणीवर गोड नारळ खवायला घेतल्यावर ती वारीक खोंचा पाडीत पाडीत जाते आणि शेवटीं निव्वळ करंवटी राहते हातांत तसं होतं. सारे शब्द नि कृति विचारांनीं खवायला घेतल्यावर गोडवं खोबरं संपून निव्वळ करवंटी हातीं राहिल्यासारखं वाटतं. पण ती खवणी किती बोथट झाली आहे ? नुसती घुटमळत राहते कृतीच्या नि शब्दांच्या गोड आठवणीवर. कितीकदां असं वाटतं कीं, नाहीं धार तिला तीच बरी. अशीच राहूं दे ती रुळत आठवणीवर. आयुष्याच्या अंतापर्यंत असंच झालं तर करवंटी नुसती अशी कधींच नाहीं येणार हाताशीं. पण साऱ्या गोष्टींना शेवट हा आहेच. आणि आयुष्याचा अंत दूरच राहो पण पाहतां पाहतां विचारांना कानस मारली जाते जोरानें आणि खसकन गोडवे शब्द खरडून येतात.

सुख म्हणतात तें त्यांच्या गोडवेपणावर रुळत राहण्याचंच ना ? तो भ्रम नको आहे मला. तें काठिण्यच मला पाहूं दे. केळ्याच्या सालीवर पाय पडतांच कळलं

तरी तोल सांवरणं कठिण. असंच हें सारं आहे. ही एकमेकांवरची माया निसरून पडल्याशिवाय राहणार नाहीं. पण पाय ठेवायला आधीं कुणी सांगितलं असतं तर विश्वास बसला नसता ही अशी घसरण आहे असं. आणि नाहीं तरी सारीं माणसं हा मायेचा खेळ खेळतात. आणि तो केळ्याच्या सालीवरून घसरण्यासारखाच आहे खेळ. तरी तो खेळावासा वाटतो. एकदां तोल जाऊं लागल्यावर पोटांत धस्स होतें. पण मग इलाज नसतो पडल्याशिवाय.

( ५ )

तुझ्या या अशा औदासीन्यानें मला किती दुःख होत असेल याची तुला कल्पना तरी येईल का ? पण तुझा हा साऱ्या गोष्टींवरचा अविश्वास पाहिला कीं वाटतं अशाच अविश्वासानें तूं संसाराकडे पाहत असशील. आतांपर्यंत जसा खेळत आणि धांव घालीत आलास तसाच हा खेळ खेळून तूं धांव घालणार असशील. आणि एक दिवस मला सांगशील, " रोहिणी बघ हा संसार. यांत काय अर्थ आहे ? यांत शिरून विटण्यापेक्षां नुसत्या कल्पनेंत गुंगून राहावं. राहिल्यावर तूं कडवेपणानें सगळ्या गोष्टींच्या चिंधड्या करायला लागलास कीं तुझी अशी बुद्धि आंधळेपणानें संसाराकडे पाहत असेल असं मला वाटत नाहीं. तुझा कशावरच कसा विश्वास नाहीं ? सद्यःस्थितींतील सगळ्याच गोष्टी ? तुला कुणाबद्दल प्रेम नाहीं. गांधी घ्या, केळकर घ्या, मालवीय घ्या, कौन्सिलवाले घ्या, सनातनी, सुधारक कोण तुझ्या कचाट्यांतून सुटला आहे सांग ? मग तूं चागलं तरी कशाला म्हणतोस ? मी तर भांबावून जातें कधीं कधीं.

ठराविकाच्या पलीकडे जाणारा, लौकिकाकडे औदासीन्यानें पाहणारा, असा वैशाख मला चालेल का ? मला कळत नाहीं. मी आपली मळलेल्या वाटेनें जाण्यांत आनंद मानणारी साधी स्त्री आहे. तुझीं तीं मतं मला कळत नाहींत.

वैशाख, मला वाटतं तुझ्या माझ्यांत सगळाच विरोध आहे. मग आपल्यामध्यें कांहीं विचारसरणीचं साम्य आहे, असं मला वाटलं तरी कसं ? आकाशाच्या पोकळीचा तलास घेणं आणि मनाचा तलास घेणं सारखंच आहे मला वाटतं. नित्य कांहीं ना कांहीं नवा विलास दाखवणारं मन—तें पुरं कळेल तरी का कधीं कुणाचं ? इतका सरळपणा, स्पष्टपणा दाखवूनहि शब्दांत व कृतींत न उमटणाऱ्या ज्या विचार-लहरी त्यांनींच माणसामाणसांत फरक केलेला आहे. आणि तोच एकीच्या भावनेच्या मानेला तात लावतो.

सगळं खरं. तुझ्या आणि माझ्यांत किती किती तरी फरक आहे. पण अजून वाटतं, कीं असंच डोळे झांकून पडावं गुंगून. तो फरक जाणून घेतला तर ओरबाडली जातें मी. आतां इतकी दुबळी झालें आहे मी मनानें

कीं तें सहन करण्याचं त्राण माझ्यांत नाहीं. वैशाख, अशीच डोळेझांक साऱ्या जन्मभर राहूं शकेल का? तशी राहील तर या जाणिवेनें उत्पन्न होणारी तडफड नि तळमळ तरी नको. पण ती गुंगी राहत नाहीं. सारा वेळ विचाराच्या काहिलींत होरपळली जात आहें मी. उकळतं पाणी जसं झांकण धडधडा उडवूं पाहत असतं तशी ही कढत विचारांची ठसठस शांततेचा भंग करते.

(५)

तूं तहान ना भूक अशा स्थितींत तुझ्या तत्त्वामागें धांवत चाललास कीं मला अगदीं एकटं-एकटं वाटायला लागतं. तूं मोठा हो, तुझ्या श्रद्धेनें जा. पण तुझी ती श्रद्धा मला डावलून टाकील अशी मला भीति वाटते. वैशाख! तूं विसरशील मला. इतकी भुलावण तुला घातली आहे तुझ्या श्रद्धेनें. तुला कल्पना येईल का? मला तुझ्या बरोबरीनें धांवतां आलं नाहीं, आणि दमून मी मागें राहिलें इकडे लक्ष्यहि न देतां तूं पुढें गेलास तर मला किती वेदना होतील? तुला हें सांगायचा धीर होत नाहीं मला. लांब दोरीनें खुंटाला बांधून ठेवलेल्या जनावराची स्वतःला उपमा देऊन तूं म्हणशील कीं "स्वतःला एके ठिकाणीं पुरून घेऊन बायका अशा संसारांत खुंटवून ठेवतात पुरुषांना." तसं असेल कदाचित्– नव्हे तसंच आहे. तोच तेवढा आनंद असतो त्यांना. वैशाख कुठेंहि गेला, त्यानें कांहींहि केलं तरी त्याच्या साऱ्या आयुष्याचं केंद्र मी आहें ह्यांतच मला आनंद नि अभिमान वाटेल. सारा वेळ तुझ्या उद्योगांत निमग्न राहून त्या सगळ्याला विटून तुझं सर्वस्व म्हणून तूं माझ्याकडे चार क्षण जरी धांव घेतलीस. तरी त्या तुझ्या ओढीनेंच माझ्यांत चोवीस तास चैतन्य भरेल.

( ६ )

तुझे शब्द अजून ऐकूं येताहेत मला आणि हंसूंहि येतं आहे. त्या एवढ्या माणसांत आपल्या बुद्धिकौशल्यानें साऱ्या विधानांची खांडोळीं करून टाकीत होतास. किती मोठा श्रोत्यांचा समाज ! कितीक वृद्ध आणि तरुण होते त्यांत. सारे विस्मित होऊन तुझ्याकडे पाहत होते. तेव्हां मला अगदीं हुंदका आला. वाटलं आतां धांवत यावं साऱ्या समाजांतून तुझ्याकडे. अगदीं किती मोठा वाटलास तूं मला तेव्हां ? अभिमानानं माझं अंतःकरण फुलून गेलं होतं. सारे लोक घरोघर गेले. तूं माझ्याकडे आलास. सारा चेहेरा पालटला तुझा. आंत-बाहेर सगळा एक-सारखा आनंद मुग्धता नि लडिवाळपणा. कांहीं आंत-बाहेर नाहीं. मला काय बोलावं तें सुचेना आणि मीं म्हटलं "किती लहान वाटतो आहेस वैशाख तूं आतां ?" आणि बेफिकिरीनें कपाळावर रुळणारीं केसांचीं झुलपें मागें डावलून जेव्हां "ऊंः" करून माझ्याकडे पाहिलंस तेव्हां-तेव्हां खरंच-खरंच तूं खूप लहान आहेस आणि खूप मोठाहि आहेस.

(७)

धरणी तापून निघालेली असते तेव्हां मेघांच्या पहिल्या प्रेमळ अश्रूंचा स्पर्श होतांच तिचें उच्छ्वासाचें सुख साऱ्या दिशांत कोंदाटून जातें. पण तेंच पाहून प्रेमळपणाची संततधार मेघांनीं धरली तर सारी पृथ्वी कलुषित होते. ही बायकांची जातच मला वाटते अशी आहे. मायेवांचून त्यांची तडफड सुरू होत राहते, आणि मायेचा मनमुराद वर्षाव झाला कीं त्यांचीं मनं कलुषित होतात. यानेंच मला वाटतं सारे संसार नीरस होतात. तूं असाच दूर राहा. माझ्या अंतःकरणाची अशीच लाही होऊन तुझ्या मायेचा ओलावा कधीं-मधींच मला मिळूं दे. ती अर्धवट मायेची तप्तता जितकी आयुष्याला रम्यपणा आणील तितकी मायेची भरपूर बरसात आणणार नाहीं.

( ८ )

मंगळागौरीच्या दिवशीं सौभाग्यासाठीं घागरी फुंकीत असतांना एखादीच्याच अंगीं येणारी बेभान वृत्ति मला मोह घालते. जाऊं दे, सारा तोल गेला तरी अगदीं धुंद. एक-दोन नव्हे, सहा-सहा तास, रात्र-रात्र ती बेफाम धुंदी टिकते. शीण नाहीं भाग नाहीं, अशी धुंदी येऊं दे माझ्या आयुष्यांत मला. हा नुसता सावधान खेळ नको. किती त्याचा शीण! इकडून गवसेन, तिकडून सांपडेन. सारखं सांवरून धांवतां-धांवतां माझं मन व्याकूळ झालें आहे. त्यामुळेंच सैरांवैरां जातं आहे पाऊल. ती बेभान वृत्ति लाभली तर असावधपणेंच पण ठरलेल्या कक्षेंत तरी हिंडेन.

वैशाख! नाहीं हा जपणुकीचा खेळ मला खेळतां येत. मग? 'वैशाख' 'वैशाख' म्हणून रानोमाळ धांवत जाऊं का? सांपडशील का मला तूं? सांपडशीलहि. पण....पण सांपडलेल्या वैशाखाला नजरेंत खिळवून टाकण्याचं सामर्थ्य आहे का माझ्यांत? किती मूर्ख मी! रोहिणी! त्याच्या तेजानें फुललेल्या दृष्टीमुळें तूं काळी ठिक्कर पडशील.

# विरलेलें स्वप्न

## ( १ )

होय, वैशाख ! माझ्या संकुचित अंतःकरणाच्या "मोठें" होण्याच्या कल्पना संकुचित आहेत. साऱ्या मोठेपणाचा कस केवळ ऐहिक दिखाऊ गोष्टींवर मी लावून घेतें हें माझ्या आतां प्रत्ययाला आलं आहे. तुझ्या अंतःकरणांतील सुप्त शक्तींची मला कल्पना नव्हती. तूं नाहीं का लगाम खेंचणार ? किती भरधांव जातोस ? सारं विश्व पालथं घालायला का निघालास ? केव्हां फिरशील माघारां ? आणि मी कुठवर तुझी वाट पाहूं ? पोटांत तुटतं रे. हे लगाम तुटले तर ? बेलगाम वारूवर स्वार होऊन तूं जातो आहेस. वैशाख ! फेंकला जाशील. तुझ्या या गतीचीं लोक स्तुतिस्तोत्रें गात आहेस. तूं फेंकला गेल्यावर ? तुझ्या या मर्त्य कुडीं-तून तूं उडून गेलास कीं ? हे हृदयद्रावक शोकगीतेंहि गातील. पण अल्प काळ. पण वैशाख तूं मला कायमचा अंतरशील. पण तुझ्याबरोबर यायचं सामर्थ्य नाहीं रे माझ्यांत. तुझ्या मागें राह्यचं तर पंचप्राण कासावीस होतात. वैशाख ! तुला माझा तिरस्कार येईल. वीट येईल. दारूच्या कोठारांत पेटती काडी टाकण्याचं धैर्य मीं

केलं आणि आतां कानठळ्या बसल्या आहेत माझ्या त्या स्फोटानें. त्या स्फोटानें सारी धरणी हादरली आहे. माझे पाय स्थिरावत नाहींत जमिनीवर. या भित्रेपणानें तुला तिटकारा येईल माझा. पण काय हें ? वैशाख, आहेस कुठें तूं माझ्याजवळ ? तूं केव्हांच दूर गेला आहेस.

मी आश्चर्यानें, आदरानें तुझ्याकडे पाहत राहतें. आश्चर्यानें, आदरानें–होय–आणि प्रेमानेंसुद्धां पाहतें. मी अशीच पाहत राहीन तुझ्याकडे कुठंहि गेलें तरी. पण दुरून. तुझ्याजवळ तुझी म्हणून येण्याचं धैर्य नाहीं मला होत. आत्मसंरक्षणाची भावना माझ्यासारखीच साऱ्या स्त्रियांत तीव्रतम असेल का ? कोण जाणे. पण माझं मी सांगतें. आणि सांगतांना माझी मला लाज वाटते—तिरस्कारहि येतो. काय करूं ? स्वतःचं संरक्षण पाहण्याखेरीज राहवत नाहीं मला. अगदीं असं वाटतं कीं तूं घरा-दारावर तुळशीपत्र ठेवून गेलास तर मी काय करायचं ? तुझं माझ्यावरचं आणि माझं तुझ्यावरचं असीम प्रेम त्यावर मी जगूं शकणार नाहीं. आणि यापुढले सुद्धां विचार मनांत येतात. एखाद्या कोंवळ्या जीवाचं रक्षण करायचं झालं तर मग कसं व्हायचं ? त्याचे हाल कसे



११/९७

पाह्यचे? त्याला काय खायला घालायचं? एकीकडे प्रेमाची दिव्यता मला भारून टाकीत असली तरी मर्त्य देहाच्या वासना मला अंकुश टोंचून जागी करीत राहतात.

स. नं. स्थळ

( १० )

पायांखालची जमीन दुभंगल्यासारखी वाटते आहे मला! कां बरं असं? मी वैशाखच्या श्रीमंतीसाठीं त्याच्यामागें धांवत होते का? खास नाहीं. मला आठवतं आहे. वैशाखची निवड केल्याचं मी आई-वडिलांजवळ बोललें तेव्हां तीं दोघें म्हणालीं "बरं झालं. नांव-लौकिकाचं घराणं आहे, श्रीमान् आहे." पण मला श्रीमंतीसाठीं मिळालेली मान्यता अतिशय बोंचली. वैशाखच्या श्रीमंतीसाठीं नाहीं तर त्याच्या कर्तबगारीचा विश्वास वाटून मीं त्याला निवडलं व त्यासाठींच आई-वडिलांनीं या निवडीच कौतुक करावं असं मला वाटलं. मला स्पष्ट आठवतं आहे हें. मग मला हा धक्का कां बसतो आहे? रोहिणी! वैशाखच्या कर्तबगारीसाठीं तूं त्याला वरलंस. त्याच्यांत कर्तव्याची ज्योत भडकलेली दिसावी म्हणून तूं जीवाचं रान केलंस. ती ज्योत पेटली आहे, भडकली आहे. कर्तव्यापुढें त्याला कशाची फिकीर नाहीं. हेंच तुझें स्वप्न होतं ना? मग आतां कां बुजतेस? वैशाखच्या मोठेपणाकडे स्तिमितपणें पाहण्याचं तुझं स्वप्न आतां खरं ठरणार आहे. मग तूं कां दचकतेस?

मला काय पाहिजे होतं हें आज कळलं म्हणून तर मला धक्का बसला नाहीं ना ? मला काय पाहिजे होतं ? वैशाखची श्रीमंती ? अजून मला पटत नाहीं हें ! मग मला माझा चुराडा झाल्यासारखं का वाटतं आहे ? वैशाख ! मला आज विचारसुद्धां नीटसा करतां येत नाहीं ! तूं घर सोडलेंस – कर्तव्यासाठीं घर सोडलेंस – पण मला वाटतं आहे मी फसलें, आणि...आणि अंतःकरणांतल्या अंतःकरणांतसुद्धां ते शब्द बोलायला मीं धजावत नाहीं. पण ते उमटताहेत आपोआप तसे !

किती कृतघ्न आहे मी !...तूं मला फसवलंस ?... वैशाख ! हे शब्द तुझ्या अंतःकरणाला ऐकूं आले तर ? तूं नाहीं मला फसवलंस. मींच मला फसवलं. केवळ तुझ्यांतील कर्तबगारीकडे आशेनें मी पाहत होतें ? कीं श्रीमंतीच्या प्रभेंतील तुझ्या दिखाऊ कर्तबगारीकडे मी पाहत होतें ? स्त्रियांच्या ठिकाणीं निसर्गजात धूर्तपणा असतो म्हणतात ! मला न कळतां माझ्या धूर्त मनानें श्रीमंत वैशाखची निवड केली असेल व त्यांतहि माझं लोभी मन कर्तबगारीची आणखी अपेक्षा बाळगून असेल ! सुखासीन आयुष्याला लोभावलेलं कोण ? वैशाख कीं मी ? आयुष्याचे मनोरथ ढांसळले असं का वाटतें आहे मला ?

## (११)

वैशाख ! कशी तुझ्यापासून दूर जाऊं? बुद्धीची नि भावनांची इतकी श्रीमंती जिनें एकदां पाह्यली तुझ्या ठिकाणीं तिला दुसऱ्या दरिद्री अंतःकरणाचा आसरा कसा घ्यावासा वाटेल? मला तुझ्याजवळ येववत नाहीं. तुझ्यापासून दूरहि जाववत नाहीं कुणीकडे. आणि अशा मधल्या निराधार अवस्थेंतहि माझी तळमळ होते. एकदां वाटतं तुझ्यापाशीं नाहीं आलें तर नुसतं तुझं बुद्धिवैभव नि पराक्रम पाहत बसेन. अशा विचारानें किती नितांत शांतता पसरते अंतःकरणांत. पण ती किती थोडा वेळ. आयुष्याचा उध्वस्तपणा, ओसाडपणा दिसूं लागतो, आणि वाटतं अशा रीतीनें एकाकी ओसाड मार्गानें चालत जाण्यापेक्षां कांट्याकुट्यांतून नि दऱ्या-खोऱ्यांतून तुझ्या सांगातीं चालण्याच्या आनंदाला मोल नाहीं कशाच. लगेच धांवत मन जातं तुझ्याकडे. तुझ्या तेजानें चरकतं. कांट्याकुट्यांतून रक्तबंबाळ होऊनहि तुझा हंसरा चेहेरा जेव्हां मी पाहतें तेव्हां मी भांबावून जातें. क्षणभर वाटतं अशीच मीसुद्धां नाहीं का हंसूं शकणार? पाय उचलतें, पण पहिल्याच पावलाला रुतलेल्या कांट्यानें

५२३८

विगलित होतें. मला माहीत आहे. तुला माझा लोभ धरल्याची सुद्धां लाज वाटेल. इतक्या भ्याड स्त्रीचे प्रलाप ऐकण्यांत दवडलेल्या वेळाबद्दल तुला पश्चात्ताप होईल. पण वैशाख ! माझी कुंवत तुझ्या एवढी नाहीं. रणक्षेत्रावरून पाठीवर वार घेऊन माघारीं फिरणाऱ्या पतीचा धिक्कार करणारी दुर्गावती मला वंद्य आहे. मला हेंहि माहीत आहे कीं अशा स्त्रिया कांहीं थोड्या नसतील. पण मी – मला लाज वाटते – मी तितकी नाहीं खंबीर.

माझी पक्की खात्री झाली आहे कीं पोषाखी मोठेपणाचीच मला लालसा होती. शीतल जलांत आढळणारें सूर्याचें प्रतिबिंबच केवळ हाताशीं धरण्याची माझी आकांक्षा. खरा तेजाळलेला सूर्य—त्याच्या दीप्तीनें मी करपून जातें.

## ( १२ )

माझी मलाच चीड आली आहे. मी कां हा अट्टाहास केला ? काय मला अधिकार होता तुझ्याकडून ही अपेक्षा करण्याचा ? वैशाख ! तुलासुद्धां असं वाटत असेल नाहीं ? ध्येयवादाचा डांगोरा पिटत असतां माझ्या पायांखालची पोखरलेली जमीन, माझ्या निःशक्त हातांतील यांत्रिकपणा, माझ्या आवाजांतील धार जाऊन येणारा बदसूर, माझ्या दृष्टींतील निस्तेजता तुला कळत असेल नाहीं ? मला तें जाणवतं आहे आणि मी दचकतें आहें.

वैशाख ! जाऊं दे मला दूर. तुझ्या दृष्टीला दृष्टि लावण्याचें सामर्थ्य माझ्यांत नाहीं. माझी मीं वंचना केली आहे. करपलेल्या हृदयानें दूर जात असतांना सगळ्या आयुष्यावर निराशेची काळी छाया पडलेली मला दिसते आहे. सुखाचीं स्वप्नें विरलीं !

## ( १३ )

मला वेड तर लागणार नाहीं ? चेतनाशक्तिच गेल्या-सारखी वाटते आहे मला. असं वाटतं कीं सारे उद्योग सोडून देऊन अगदीं स्वस्थ पडून राहवं. आणि स्वतः-लाच स्वतःच्या विचारांच्या तोंडीं लागून घ्यावं. मीं केलं हें बरं केलं का ? कितीहि नाहीं म्हटलं तरी स्त्रीचं जीवित हें अवलंबी असल्याशिवाय तिला बरं वाटत नाहीं. सारा जन्मभर तिची धडपड तो आधार मिळवण्यासाठीं किंवा असलेल्या आधाराला बिलगून राहण्यासाठीं चाल-लेली असते. असं वाटतं कीं वैशाखाला सारं म्हटलेलं-बोललेलं पुसून जावं. आणि पुनः इतकी विलक्षण ओढ लागते कीं मनाचे धागे या ताणानें तुटणारसं वाटतं. वैशाख दिसला कीं वाटतं पुनः एकदां जावं आणि सगळं–सगळं जें–जें मनाला वाटतं तें त्याच्याजवळ बोलावं. आणि माझ्या विचाराच्या प्रामाणिकपणाची साक्ष त्याला पटवावी. पण नको, मला माहीत आहे. आजपर्यंत कितीक वेळां अशीच विचार पिंजायला नि पिसायला म्हणून मी तुझ्याकडे आलें. आणि तूं दिसलास कीं विचार आणि वाणी मुग्ध होऊन बसतात. एवढंच नव्हे तर त्यांना बोथटपणा येतो

एकप्रकारचा. माझा मलाच राग यायला लागला आहे आतां. तुला भेटून आलें कीं निश्चय करतें. आतां हें शेवटचं. पुरे झाली आतां ही फसवणूक. पण जितका दृढ निश्चय करून मी निघतें तितकीच, नव्हे त्याहून किती तरी पटींनीं रुखरुख वाढते माझी. पायखोडा आणि मानखोडा घातलेली गाय जशी दोन्ही बंधनें न जुमानतां ओढीनें धांवत जाते तशी मी तुझ्याकडे येतें. ही माझी धांवाधांव कधीं संपणार आहे कळत नाहीं मला !

( १४ )

मला दिसतं आहे कीं तड-जोड, देवाण-घेवाणवृत्ति यांनींच जीवन जगणं शक्य आहे. म्हणून माझ्या अपेक्षांचे तीक्ष्ण भाले जेव्हां मला आपलं स्वरूप दाखवूं लागतात तेव्हां माझी मीच चिडून म्हणतें " सारं मनासारखं करायचं म्हटलं तर माणसांत राहून जगायला नको. " माझ्यांत जेव्हां ही तडजोडीची वृत्ति कमी आहे असं मला दिसतं त्याच क्षणीं माझं जीवन रूक्ष भकास होणार याची मला भीति वाटूं लागते. अशी कशी माझी वृत्ति ही ! मला सगळं माझ्या मनासारखं पाहिजे असतं तेव्हां माझ्या मनांत दुसऱ्याचा विचारसुद्धां येत नाहीं. तुला माझ्यामधील कितीतरी गोष्टी टोंचत असतील. तुझ्यांतील मला टोंचतात. अशा वेळीं त्या गोष्टींची उपेक्षा करून – पण वैशाख ! कित्ती निराळा आहेस तूं सामान्य माणसांपेक्षां ! तुझा इतका त्याग, इतकी निवृत्ति माझ्या पचनीं पडण्यासारखी नाहीं. किती तयार केलं मन तरी तडजोडीला तयार होत नाहीं. मोठ-मोठ्या लोकांचे विद्वत्ता-पूर्ण ग्रंथ जसे न वाचतां त्यांच्या मोठेपणामुळें निव्वळ कौतुकानें पाह्यचे असतात तसं तुझ्याकडे तुझ्या मोठे-

पणामुळें मी कौतुकानें पाहीन; पण तुझ्या आयुष्याचें एकेक पान उलटून त्यांतील शब्द आणि शब्द पाह्यची ताकद नाहीं माझ्यांत.

( १६ )

मना ! तूंच ना हीं प्रेमाचीं टोलेजंग मंदिरं उठवलींस ? टोलेजंग खरीं, पण अदृश्य. कुणाला कधीं दिसायची नाहींत. क्षण-क्षण, दिवस-रात्र, सारा वेळ धांव-धांव धांवून वर्षानुवर्ष बांधीत आणलेलीं हीं मंदिरं ! कां एवढे श्रम घेतलेस ? कुणासाठीं ? मना ! त्याला पाया नाहीं रे ! फुंकरेसरशीं उडतील तीं. हृदयांतील रक्तबिंदूंचा खुराक घेत बांधलेलीं तुझीं हीं रंगमंदिरं ! व्यर्थ ! किती व्यर्थ शीण तो ! हो. हीं रंगमंदिरं आहेत. त्यांत मला कुणा-लाहि देव म्हणून आणून नाहीं बसवायचं. मला चीड आली आहे. असा खुळेपणा कां ? कां तूं हीं उभीं केलींस ? कशाच्या आधारावर ? मला आतां ठोकरा देऊन पाडून टाक. धांव. तितक्याच जोरानं नव्हे, अधिक. हीं डोळ्यांपुढें नकोशीं झालीं आहेत. तुझ्या शक्ती शुष्क झाल्या असतील तर माझ्या रक्ताचा ओलावा घेऊन लाग कामाला. पाडून टाक तीं. झिजूं दे मला. बांधतांना झीज, पाडतांना झीज. पण दृष्टिआड होऊं दे. स्मृतींतून जाऊं दे. मना ! माझ्या मना ! वेड्या ! कुणासाठीं तूं मंदिर बांधलंस ? देवासाठीं ? नाहीं रे ! तो देव नव्हता. माणूस. बेफामपणें दौडत चालला आहे तो. त्याच्यासाठीं केलास हा खटाटोप ?

[ परिशिष्ट ]

# तुमच्या प्रश्नांचीं उत्तरें*

संपादक महाशय !

तुमचं पत्र वाचलं आणि मी बुचकळ्यांत पडलें. एकदां वाटलं कीं उत्तरादाखल मला खूप लिहितां येईल आणि एकदां वाटलं कीं काय नि कशाला उत्तरं द्यायचीं या प्रश्नांना ?

तुम्हीं मला "बुरखा मंडळांतील सदस्य" म्हटलं होय ? पण त्या सदस्यांची मनोभूमि माझ्यापेक्षां निराळी आहे कीं सारखी आहे हें कांहीं मला माहीत नाहीं आणि तुम्हांला तरी माहीत आहे का ? नाहीं तर हें मंडळ म्हणजे आपली उसांआंवळ्यांची मोट व्हायची ! हें जाऊं द्या. तुम्हांला "हा मित्रेपणा कां ?" असंच ना म्हणायचं आहे ? हा मित्रेपणा नाहीं. मी अगदीं उदासीन आहें या बाबतींत.

तुम्हांला आठवत असेल. किती सहजा-सहजीं आपण एक दिवस बोलत बसलों होतों इकडल्या-तिकडल्या

---

*—प्रतिभा "विशेषांक", एप्रिल १९३५

गोष्टी. आणि तुम्ही एकदम म्हणालां "असा आहे तर स्त्रीस्वभाव!" त्या दिवशीं तुम्ही आणि मी कितीतरी वेळ बोललों. तें सगळं बोलणं माझ्या मनांत घोळत होतं. त्या दिवसापासून माझ्या मनांत इतका कोलाहल माजला कीं मला त्याला शब्दस्वरूप दिल्याशिवाय राहवेना!

एक, दोन, तीन किती तरी–अनंत कोडीं माझ्या नजरेसमोर नाचूं लागलीं, शेवटीं मी एकेक पान लिहीत गेलें. महिना पंधरा दिवसांतच मला वाटलं, "किती लिहिणार मी, माझ्या या भंगुर लेखणीनें?" त्यांतून मला लिहिण्याची संवय नसल्यामुळें मी अगदीं कंटाळून गेलें. सगळीं लिहिलेलीं पानं ठेवून दिलीं एका बाजूला. सारं अफाट जीवित डोळ्यापुढं येऊन माझ्या वीतभर लेखणीच्या असमर्थ वाणीकडे मीं हताश होऊन पाहिलं.

एक दिवस तुम्हीं मला कोणतंसं इंग्रजी पुस्तक दिलंत आणि म्हटलंत, "पाहा तर खरं हे लोक स्त्रियांचं जीवन किती नाजुक लेखणीनें–कुशलतेनें रेखाटतात तें." मीं तें पुस्तक वाचलं आणि मला वाटलं कादंबऱ्या कसल्या? कादंबऱ्यांहून अद्भुत सत्य आणि वैचित्र्य जगांत आहे –

हिंदुस्थानांत आहे, महाराष्ट्रांत आहे, घरोघरीं आहे, – पण पाहील त्याला.

काय विचार माझ्या मनांत आला कोण जाणे? मी एकदम उठलें आणि मीं चितारलेलीं पानं हातीं घेऊन पाहिलीं एकदां. तुम्हीं म्हटलंत, "काय हो तें?" तुमच्या तेथल्या अस्तित्वानें मी क्षणभर कातर झालें आणि लगेच तीं पानं तुमच्यापुढं टाकून म्हटलं "दमून गेलें मी. माझीं नव्हं बरं हीं कामं. पण तुम्हांला आपली सांगतें कीं जीवनाची अद्भुतता सगळीकडेच आहे. पाहील आणि रेखाटील त्याला."

तुमच्या-माझ्या बोलण्यावरून ईर्ष्येनं पण केवळ माझीच करमणूक म्हणून लिहिलेलीं तीं पानं! तुम्हीं तीं वाचलींत. सहजासहजीं झालेलीं बोलणीं आणि त्यांतून निर्माण झालेलं तें लिखाण प्रकाशांत आणण्याची तुम्हीं धमकी दिली मला, तेव्हां मी अस्वस्थ झालें. मनांत विचार आला कीं काय छापायचं त्यांत? माझी लेखणी कशी पुरी पडेल त्याला आणि समाधान तरी कसं व्हायचं कुणाचं त्यानें?

छापलंत खरं तुम्हीं तें सारं पण मला त्याचं सुख-दुःख कांहीं नाहीं. मग नांवाचं कसलं आलं आहे काय?

आहे हें असं आहे बरंचसं जीवित. याहूनहि विविध आणि आश्चर्याचं आहे. ज्याला-ज्याला त्यांतून माप भरून घेण्याची इच्छा असेल त्यानें तीं भरून घेऊन पाहवीं आणि दाखवावं हें बहुरूपी जग हवं तर. पण त्यांत माप भरणाराचं काय महत्त्व आहे ?

" बुरखा-मंडळांतील सदस्य " म्हणून घेण्यांत वाईट वाटलं मला. मापांतील वस्तूला महत्त्व आहे, माप टाकणाराला नाहीं; या समजुतीनें मी अंधारांत राहिलें. पण तें माप टाकणाराकडेच लक्ष्य वेधायला अधिक कारण झालं, याचं वाईट वाटलं मला. खरं म्हणजे नांवांत काय आहे ? मापांत काय आहे तेंच कां नाहीं पाहूं ? मापाकडे नुसती ओझरती नजर टाकून " भरल्या जीवनराशींत असं नाहींच " असं कां म्हणावं ? मला खरंच कळत नाहीं. सारीं पांढरपेशांचीं घरं एकाच वळणानें चाललीं आहेत असं वाटतं का ? मला खरंच वाटत नाहीं. वर-वर प्रशांत दिसणाऱ्या जलाशयांत लहान-लहान माशांच्या मुक्या विलोल हालचाली असतातच नाहीं का ? जवळ जाऊन पाहा म्हणजे त्या मुकेपणाला वाचा फोडावी असं वाटल्याशिवाय राहत नाहीं. आपल्या जीवनांत वाटतो किंवा भासतो तितका एकसूर, एकरंग नाहीं. मनुष्य आहे, मन

आहे, तेथें संकेतांखालीं दबलेल्या जीवनांत सुद्धां निर-निराळ्या तऱ्हेचं श्वसन ऐकूं येतं.

मला वाटतं दिवाळींतलीं पोटांत दारू घेऊन केव्हांहि भडकायला तयार असलेलीं फटाका, चंद्रज्योत, भुईनळा वगैरे असतात ना? तशीच प्रत्येक घरांतील एक-एक व्यक्ति असते. प्रश्न एवढाच कीं सरदलेली दारू पेटायला वेळ लागेल. कोरडी दारू तेव्हांच भडकेल. पण सग-ळ्यांत वैचित्र्य आहे, सगळ्यांत जीव आहे. आपण काय करावयाचं? त्यांचंच वैचित्र्यानें जळणारं जीवन पाह्यचं. फटाके, भुईनळे, चंद्रज्योती कुणी केल्या हें पाहण्यांत शक्तिसर्वस्व खर्च कशाला करायचं?

मीं 'पुस्तक' म्हणून लिहावं, तें लोकांसाठीं लिहावं, त्यांच्या टीकेला उत्तरं द्यावीं, स्वतःचं मंडण करीत बसावं, कां एवढा अट्टाहास? "तुम्हीं टीकांना उत्तर कां देत नाहीं?" असं तुम्ही विचारतां. पण तुमच्या प्रश्नाचं मला हसूं आलं. माझं राहणं आधीं तुमच्या या साहि-त्यिकांच्यापासून किती दूर! त्यांच्या टीका माझ्यापर्यंत पोंहोंचताहेत कशाला? मधून मधून तुमची करमणूक म्हणून तुम्हीं पाठविलेलीं कर्तनं माझ्या दृष्टीस पडलीं,

पण त्यांनीं माझं मन उजळलं नाहीं किंवा कांहीं नाहीं. तो सारा लेखिकेला उजेडांत आणायचा अट्टाहास. ज्या कांहीं लोकांनीं लेखनविषयांवर लेखणी चालवली त्यांपैकीं बहुतेक सर्वांचीच सत्याचं स्वरूप पाहण्याची तयारी नसलेली मला दिसली. त्यांना उत्तर म्हणून सांगायचं काय? "हें असंच आहे" म्हणून? आणि तें त्यांना नसलं पटणारं तर सांगायचा अट्टाहास तरी कशाला? आहे हें असं आहे. पाहिजे त्यांनीं पहावं, नकोच असेल त्यांना सांगणार नि पटवणार तरी कसं?

'सत्य' 'सत्य' म्हणून वाटेल तें 'उघडं' सत्य अभिजात वाङ्मयांत चितारायचं नाहीं हें खरं आहे. पण वाङ्मयापुरताच सोंवळेपणा पाहूं जाणाऱ्या कांहींकांहीं लोकांच्या स्वतःच्या कृति—आचरण किती तरी ओंगळ असतं नाहीं? 'कळ्यांच्या निःश्वासां'त न पाहिलेले ऐकलेले असे कितीक निःश्वास या अभिजाततेच्या पुस्तककर्त्यांपैकींच कांहींनीं कित्येक जीवांना सोडायला लावले असतील!

आतांपर्यंत मी आपलं कांहीं-बाहीं वाङ्मय वाचीत आलें, तेव्हां-तेव्हां मला चुकल्या-चुकल्यासारखं होई. असं वाटे

कीं वाङ्मयांत पात्रं कशीं रेखाटायचीं यांचे जणुं संकेत ठरवलेले आहेत. तुम्हांला नाहीं का वाटत कीं आपल्या नायक-नायिका आणि खलपुरुष इत्यादिकांनीं बनलेल्या आपल्या वाङ्मयाच्या जगांत दोनच तऱ्हा प्रामुख्यानें दिसतात. देव नाहीं तर दानव. मानव नाहींच कुठें. मानवासाठीं देवाचीं किंवा दानवांचीं चित्रं रेखाटलीं तर मानवाला ममत्वानें तिकडे पाहण्याची कशी इच्छा होईल ? तशी न झाल्यास वाङ्मयाचा हेतु तरी कसा साध्य होईल ?

मानवाच्या मनांत चाललेलीं बरीं-वाईट आंदोलनं वर्णन करणें गैर होईल काय ? अंतरंगाचे उमाळे क्षणभर अस्वस्थ करीत असले तरी त्यांचें अस्तित्व अमान्य करून कसं चालेल ? पृथ्वीच्या अंतरंगांतून शीतल निर्झर वाहतात, उष्णोदकाचीं उन्हाळींही वाहतात. उष्ण जरी उदक असलं तरी कधीं न हटणारे रोग सुद्धां त्यानें जातात.

यथातथ्य रीतीनें वर्णन करणं हें काम कठिण तर खरंच. पण मला वाटतं सहानुभावानें वर्णन करणं हें सर्वांत कठिण आहे नाहीं ? देवांचीं अगर दानवांचीं वर्णनं नको

असून मानवांचीं हवीं असल्यास, तीं करायलासुद्धां सहानुभावानें पाहण्याची ताकद पाहिजे. निरपेक्ष निःपक्षपाती भूमिकेवर जाऊन प्रत्येक मनुष्याचीं अंतरंगाचीं गूढं उकलून दाखवलीं व तींहि सहानुभावानें उकललीं तर कुणालाच पक्षपात होण्याचा संभव नाहीं. पतिताचं चरित्र सहानुभूतीनें रेखाटणं म्हणजे पतनाला उत्तेजन देणं नसून त्याला निःपक्षपातानें वागवणं आहे असं नाहीं का? पतित तर खराच. पण कां? कोणत्या परिस्थिती-मुळें झाला? विचित्र परिस्थितीपुढं अशरण झाल्यानें पतित झालेल्या माणसाचं तसंच हुबेहुब चित्र काढलं तर पतनाकडे प्रवृत्ति झुकवणं नसून न्याय्य दृष्टीनें त्याच्याकडे पाहणं एवढाच अर्थ होईल नाहीं? असंच मला वाङ्मय वाचतांना वाटे.

जें जें ललितवाङ्मय आपण वाचतों त्याला कोणत्या ना कोणत्या तंत्राच्या चौकटींत बसवलेंच पाहिजे; तसें तें बसत नसेल तर तें कमअस्सल झालं, असं मानावंसं मला वाटेना. निसर्ग नाहीं का? निर्मितीच्या वेडानें फुलून गेलेला निसर्ग किती वैचित्र्यानें निर्मिति करीत असतो. एक झाड दुसऱ्या झाडासारखं नाहीं. एक माणूस दुसऱ्या माणसासारखं नाहीं. प्रत्येकांत वैचित्र्य. पण ती निसर्गाची

सं. नं.
स्थळ



हतबुद्ध करून टाकणारी–निर्मितीची शक्ति जें जें निर्माण करते तें तें हृदयहारी आणि मनोहर असतंच नाहीं का ? त्या शक्तीचा बेबंद नाच ज्या-ज्या ठिकाणीं आपण पाहातों तेथें त्या भव्यतेनेंच आपण थक्क होतों. सगळीकडे अकृत्रिमता ! त्या निसर्गाच्या अकृत्रिम निर्मितीनें – मग ती निर्मिति अणुएवढी असो वा आकाशा-एवढी असो–भारून जातों आपण. कां ? आपलं हें सारं कृत्रिम इवलं-इवलं जग नि त्याचे पडलेले कांच विसरण्यासाठीं.

निर्मितीचं वेड लागलेल्या लेखकानें तंत्राची कृत्रिमता कां जुमानायची ? प्रतिभेच्या तुफान आवेगापुढं तंत्राचे कृत्रिम बंध राहणार तरी कसे ? सुंदरता–खिळवून धरणारी सुंदरता–हवी असेल, स्तिमित करून ठेवणारं सत्य हवं असेल, तर कृत्रिमता फोडून प्रतिभेनें केलेलं नर्तनच हवं असं वाटायला लागतं. कादंबरी, नाटक, लघुकथा, दीर्घकथा, कहाणी, काव्य, नाट्यछटा–हे आणखी असलेच कांहीं प्रकार, त्यांचीं तंत्रं, सगळे अंतरंगाचे उमाळे त्याच तंत्राच्या चौकटींत बसलेच पाहिजेत का ?

निःपक्षपाताच्या भूमिकेवरून सहानुभूतिपूर्वक विशाल दृष्टीनें प्रतिभावान् लेखकानें चितारलेलीं चित्रं–तीं कां

हृदयंगम वाटणार नाहींत ? पिचवून टाकणाऱ्या या जगाचीं बंधनें क्षणभर स्वतःपासून गळून पडल्याचा आभास होऊन निर्व्याज आनंद लेखकाला व वाचकाला कां होणार नाहीं ? संकुचित दृष्टि एकदां नष्ट झाली कीं तेथें लेखकाप्रमाणेंच वाचकांचंहि अंतःकरण सहानुभूतीनें कां उलून येणार नाहीं ?

विभावरी शिरूरकर.

REFBK-0005237

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अ. क्र. ५२३७